# माणूस

शनिवार । ३० डिसेंबर १९७८ । ७५ पैसे


## शतरंज के खिलाडी

जनता नेते परस्परात भांडत आहेत हे दृश्य आता काही नवीन राहिलेले नाही; पण नेते आणि अनुयायी यांच्यातही काही विसंवाद आहे, हे दृश्य मात्र, इंदिरा गांधी हक्कभंग-प्रकरणी जे शिक्षानाटच झाले, त्यामुळे प्रथमच लोकांसमोर येत आहे. मोरारजींसकट जवळजवळ सर्व पक्षांचे नेते इंदिरा गांधींना सौम्य शिक्षा व्हावी या मताचे होते, असे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या या नेत्यांच्या हालचालींवरून व वक्तव्यांवरून स्पष्ट झालेले होते; पण या सर्व नेत्यांचे मत जहाल अनुयायांनी धुडकावून लावले व शेवटी कडक शिक्षेचा मोरारजींचा ठराव बहुमताने संमत झाला. नेते आणि अनुयायी यांच्यात एवढी दरी का पडली? दरी खरोखरच पडलेली होती की नुसती दाखविण्यापुरती होती? अशा स्वरूपाची दरी जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या समाजवादी–भालोद या घटकात असती किंवा नव्याने पडली असती तर ते अगदीच आश्चर्यकारक तरी म्हणता येणार नाही. कारण या घटकांची बांधणी मजबूत पायावर कधीच झालेली नव्हती. अनुयायी आणि नेते यांच्यात नेहमीच अंतर व कधीकधी परस्परविरोधही राहत आलेला आहे; पण जनता पक्षातील पूर्वाश्रमीच्या जनसंघ या घटकाबाबत असे काही म्हणता येणार नाही. पक्षबांधणीचा त्यांचा नमुना इतरांनी हेवा करावा असा होता. मग अटलजी–नानाजी–अडवानी यांचा सौम्य शिक्षेचा पर्याय त्यांच्या अनुयायांनी मानला नाही याचा अर्थ काय होतो? नेतृत्वाचे अवमूल्यन झाले की अनुयायी शिरजोर बनले? अटलजींचा शब्द, अधिकार पूर्वाश्रमीच्या जनसंघ गोटात अद्यापपर्यंत तरी डावलला गेलेला नाही. मग शिक्षेसारख्या एका दुय्यम प्रश्नावर सर्व शिस्तबद्ध अनुयायीवर्ग एकदम केवळ अटलजींवरच नाही तर अटलजी–नानाजी–लालकृष्णजी या त्रिमूर्तीवर कुरघोडी करण्याएवढा धीट बनावा, हे जरा चमत्कारिक गौडबंगालच नाही का? अटलजी वगैरे जनसंघनेते निदान प्रथमपासून सौम्य शिक्षा असावी या मताचे तरी होते; पण मृणाल गोरे यांचे ऐनवेळी झालेले मतपरिवर्तन काही वेगळेच राजकारण सूचित करते. इंदिरा गांधींच्या लोकसभेतील भाषणानंतर मृणाल गोरे यांनी लगेचच कडक शिक्षेची मागणी करणारे जोरदार भाषण केले. या भाषणाला जनता खासदारांकडून टाळ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसादही लाभला. पण एक वार्ता अशी आहे की, शेवटच्या घटकेला सौम्य शिक्षेसाठी प्रयत्न-

पृष्ठ २ वर

# साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे–अंक एकतिसावा**

३० डिसेंबर १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

□

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□


शील असणाऱ्या चंद्रशेखर–जगजीवनराम वगैरे नेत्यांच्या गोटात मृणाल गोरे यांचीही उपस्थिती होती. 'आता फार उशीर झाला. अगोदर तुम्ही जागे व्हायला हवे होते', असे मोरारजीभाईंनी या गोटाला चमकावले अशी नोंद 'टाइम्स'च्या इंदर मल्होत्रा यांनी आपल्या वार्तापत्रात केली आहे, ती बरीच सूचक दिसते. (दि. २१ डिसेंबर अंक) मोरारजींना त्यांच्या इच्छेविरुद्ध प्रथम बहुमताच्या दडपणाने कडक शिक्षेच्या टोकापर्यंत ढकलत न्यायचे, टोक गाठल्यावर एकेकाने काढता पाय घेऊन लोकक्षोभाच्या खाईत त्यांना लोटून आपण नामानिराळे राहायचे, असा तर काही मोरारजीविरोधी बनाव, या नेते आणि अनुयायी यांच्यातील तथाकथित विसंवादामागे नसावा? कडक शिक्षा झाली की, लोकांत अप्रियता निर्माण होणार हे उघड दिसत होते. या अप्रियतेचे खापर मोरारजींच्या डोक्यावर फोडता येण्याची संधीही उपलब्ध झालेली होती. शिक्षेचा ठराव मोरारजीच तर मांडत नव्हते का? लगाव बत्ती! एका दगडात दोन पक्षी. बाईंवर सूड आणि मोरारजींना धक्का! जनता पक्षातील सर्व नेते सौम्य शिक्षावादी असताना, पूर्वाश्रमीच्या शिस्तबद्ध जनसंघवाद्यांसहित सर्व अनुयायांनी मात्र कडक शिक्षेचा आग्रह धरावा, तसा ठराव संमत करून घ्यायला नेत्यांना भाग पाडावे, या नेते आणि अनुयायी यांच्यातील विसंवादाचा एरव्ही कशाने उलगडाच होऊ शकत नाही. अपराध करणाऱ्या बाई दोन-चार दिवस तुरुंगात जाऊन 'हीरो' झाल्या! शिक्षा फर्मावणारे मोरारजी मात्र आणखीनच बदनाम झाले, होत आहेत. मोरारजींच्या बदनामीच्या झळा जनता पक्षालाही भोगाव्या लागत आहेत याची पर्वा कोण करतो? सगळेच शतरंज के खिलाडी! राजाला शह दिला यात समाधान! राज्य चालले याचे कुणाला भानच नाही!

□

बाई चिकमगळूरला पुन्हा उभ्या राहणार म्हणतात. म्हणजे पुन्हा तुफानी दौरे, धमाल भाषणे, भरपूर प्रसिद्धी या सर्व गोष्टी आल्याच. त्यांना ८२ सालापर्यंत लोकसभाप्रवेशाला पूर्ण बंदी असती तर गोष्ट वेगळी; पण या तात्पुरत्या हकालपट्टीमुळे उगाचच त्यांच्या हातात कोलीत दिल्यासारखे होणार आहे. चरणसिंगांनी बंड पुकारलेच आहे. बाईंचे कोलीत आणि चरणसिंगांचे बंड यांची युती झाली तर दक्षिणेकडचे वारे उत्तरेकडेही भिरभिरणे अशक्य नाही. समस्तीपूर आणि फत्तेपूर या निवडणुकातील जनता पक्षाचे विजय तसे निसटते व घसरतेच आहेत. २५–३० हजार मताधिक्क्याचे फरक सहज भरून निघू शकतात. महाराष्ट्र डळमळीत आहे. बाईंना अटक झाल्यावर देशभर सव्वा ते दीड लाख लोकांची धरपकड झाली – करावी लागली, हा आकडा नक्कीच दुर्लक्ष करता येण्यासारखा नाही. दोन काँग्रेस एक होण्याची प्रक्रिया जोरात सुरूच आहे. सत्ता हस्तगत करणे हे बाईंचे क्रमांक दोनचे उद्दिष्ट आहे हे जनता पक्षाने अद्याप पुरेसे ध्यानात घेतलेले दिसत नाही. जनता पक्ष फोडणे, खिळखिळा करणे, खतम करणे हे बाईंचे उद्दिष्ट क्रमांक एक आहे. मग सत्ता तात्पुरती दुसऱ्या कुणाकडे द्यायलाही त्या मागेपुढे पाहणार नाहीत! उद्या त्यांना एक किंवा अनेक फौजदारी खटल्यात अडकवून तुरुंगात ढकलले तरी जनतापक्षाला त्यांच्यापासून असलेला धोका मुळीच कमी झालेला नसेल! तुरुंगातूनही त्या चरणसिंगांना पुष्पहार पाठवू शकतातच की! एकदा त्यांच्या मनासारखा

जनता पक्ष फुटला की निर्माण होणाऱ्या गोंधळात देश त्यांच्याकडेच आशेने पाहणार हे त्या पुरेपूर ओळखून आहेत. सगळे हुकुमशहा गोंधळातून जन्मास आलेले आहेत. मग ते डावे असोत की उजवे. गोंधळ कमी करणे, देशात अनुशासनाचे वातावरण उत्पन्न करणे हा बाईंच्या पराभवाचा राजमार्ग आहे. या राजमार्गावर त्यांच्याशी सामना देण्याऐवजी गल्लीबोळातले क्षुद्र हल्ले चढवण्यात जनतापक्ष आज मश्गुल झाल्यासारखे दिसत आहे.हवा आहे दूरदृष्टीचा सेनापती. भरताड मात्र झाली आहे फौजदार मंडळींची आणि हे फौजदारही एकमेकात भांडत राहिले आहेत. देश अराजकाच्या टोकाकडे हळूहळू पण निश्चितपणे ढकलला जातो आहे. या टोकावरून कडेलोट होणार आहे तो शेवटी आपल्या लोकशाहीचा. मोरारजींच्या कडेलोटासाठी आतुर झालेल्यांनी शेवटी हा विचार करायला नको होता का?

-श्री. ग. मा.

---

मुंबई वार्ता ।

विनय सहस्रबुद्धे

## □ प्रीमियर प्रकरण

कुर्ल्याचा प्रीमियर ऑटोमोबाईल्स हा कारखाना सुप्रसिद्ध आहे तो दोन कारणांसाठी. उत्कृष्ट बनावटीच्या फियाट गाड्यांचे उत्पादन आणि अलीकडे वारंवार होणारे कामगार विरुद्ध कामगार किंवा कामगार विरुद्ध व्यवस्थापन असे हिंसक संघर्ष, ही ती दोन कारणे आहेत.

मोटार-कार बनविण्याच्या क्षेत्रात प्रीमिअर ऑटोमोबाइल्स या कारखान्याचा अवघ्या आशिया खंडात दबदबा आहे. १९४८ च्या सुमारास हा कारखाना काढण्यात आला व आजतागायत त्याचा उत्तरोत्तर विस्तार होत गेला आहे. कुर्ला, वडाळा आणि डोंबिवली-कल्याण दरम्यान मानपाडा या तीन ठिकाणी या कारखान्याचे तीन विभाग आहेत व तिन्ही कारखाने मिळून एकूण ९००० एवढ्या प्रचंड संख्येत कर्मचारी या कंपनीत कामाला आहेत.

गेल्या १६ डिसेंबरपासून या कारखान्यात कामकाज–स्थगिती जारी करण्यात आली असून ३ जानेवारीपासून संपूर्ण टाळेबंदी लागू करण्यात येईल. या वर्षाच्या सुरुवातीस सुमारे ९९ दिवसांच्या टाळेबंदीमुळे ज्यांचे शेकडो रुपयांचे नुकसान झाले त्या, या कंपनीच्या हजारो कामगारांवर पुन्हा एकदा अनिश्चित कालावधीपर्यंत घरी बसून रहाण्याचा प्रसंग ओढवला आहे.

वस्तुतः संप, टाळेबंदी, हिंसाचार इ. प्रकार मुंबईच्या कामगार-चळवळीस नवे नाहीत. गेल्या वर्षी मुकुंद आयर्न अँड स्टील या कंपनीतही कामगार व मालक यांच्या संघर्षात मोठ्या प्रमाणावर हिंसेचा वापर झाला व ते प्रकरण खूपच चिघळले होते. लार्सन अँड टूब्रो ही प्रचंड कंपनीही औद्योगिक संघर्षासाठी प्रसिद्ध आहे. या सर्वच मोठ्या कंपन्यांमध्ये प्रतिस्पर्धी कामगार संघटनांमधील संघर्षातून पुढे संप, टाळेबंदी इ. प्रकार घडतात. एकाच कंपनीतील कामगारांमध्ये दोन प्रतिस्पर्धी संघटना असणे व्यवस्थापक–मालक यांना नेहमीच सोयीचे असते व या अंतर्गत संघर्षाच्या तव्यावर मालकवर्गाची पोळी भाजली जाते. प्रीमियर ऑटो. मधील सध्याच्या संघर्षाचे उदाहरण या संदर्भात प्रातिनिधिक ठरणारे आहे व म्हणून त्याचा विस्तृत आढावा घेत आहे.

या कंपनीच्या कामगारांची चळवळ अनेक लहान-थोर कामगार-नेत्यांनी आजतागयत हाताळली आहे. सुरुवातीस श्री. राजा कुलकर्णी, नंतर आर. जे. मेहता, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या काळात एस. एम. जोशी, त्यानंतर दत्ता देशमुख, प्रभाकर कुंटे इ. धुरंधर कामगार-नेत्यांनी या कंपनीतील कामगार-चळवळीवर संस्कार केले आहेत. अगदी अलीकडे पुन्हा एकदा आर. जे. मेहता यांचे नेतृत्व कामगारांनी स्वीकारले होते. इंटक आणि काही काळ हिंद मजदूर सभेशीही या कंपनीतील कामगार-संघटना संलग्न होत्या. कामगार-क्षेत्रातील रथी-महारथी या कंपनीच्या कामगारसंघटनेत असले तरी (की असल्यामुळेच?) कामगार व व्यवस्थापन यांचे संबंध सलोख्याचे नव्हते व आजही ते नाहीत. आजही प्रीमियर कामगारांच्या असंख्य तक्रारी आहेत व त्यांतील काही खरोखरच अर्थपूर्ण आहेत.

या कारखान्यातून दर दिवशी ७४ गाड्यांचे उत्पादन होते. वस्तुतः एवढ्या प्रचंड उत्पादनक्षमतेसाठी १२ हजारांपेक्षा जास्त कर्मचारी आवश्यक आहेत; पण हे काम ९ हजार कर्मचाऱ्यांकडून करवून घेतले जाते व त्यामुळे कामगारांवर कामाचा असह्य ताण पडतो, असे कामगारांचे म्हणणे आहे. ह्या कारखान्यातील कामगारांना इन्सेंटिव्ह म्हणून जी रक्कम दिली जाते तिच्यात प्रचंड तफावत आहे. शिवाय दिलेल्या इंसेंटिव्हचा मूळ वेतनात समावेश करून मग भविष्य निर्वाह निधी कापण्याचे कंपनीचे धोरणही कामगारांना मान्य नाही.

वेतनवाढ किंवा इंसेंटिव्हबाबत कामगारांच्या मागण्या कंपनीने कधीही विचारात घेतलेल्या नाहीत. त्या फेटाळून लावताना गेली अनेक वर्षे 'कंपनी तोट्यात चालत आहे' असे ठराविक उत्तर व्यवस्थापनाकडून दिले जाते. एका कामगाराने या बाबत सांगितले की, कंपनी इतकी वर्षे तोट्यात असेल तर गाड्यांचे उत्पादन कमी का करीत नाहीत? काही पाश्चात्य देशांत दोन, तीन वर्षे सलगपणे कंपनी तोट्यात जात असेल तर सरकार तिची सूत्रे स्वतःकडे घेते. ही कंपनी जर खरोखरच तोट्यात असेल तर सरकारने ती जरूर ताब्यात घ्यावी.

या कर्मचाऱ्यांचा असा आरोप आहे की, कंपनीला तोटा होतो ही

निव्वळ भूलथाप आहे. कारण कंपनीचे सर्व व्यवहार, कागदोपत्री पुराव्यापुरते, मालकाच्या घनिष्ठ संबंधातील कंपन्यांशीच चालतात व त्यामुळे मूळ किमतीऐवजी सवलतीच्या किमतीत गाड्या विकल्याचे दाखविले जाते. नंतर मात्र अधिक बेहिशेबी रक्कम घेऊन या गाड्या पुन्हा विकल्या जातात व अनधिकृतपणे कंपनीची तिजोरी अधिकाधिक भरत जाते.

या कंपनीतील सध्याचा संघर्ष हा प्रामुख्याने दोन संघटनांमधील संघर्ष असला तरी त्याची बीजे ही कामगार–असंतोषात आहेत. वारंवार व एकाएकी होणाऱ्या बदल्यांमुळेही कामगार संत्रस्त आहेत. शिवाय निष्ठावान व कसून काम करणाऱ्या कामगारांना नव्हे तर कामगार-नेत्यांनाच वारंवार पदोन्नती दिली जाते, असाही कामगारांचा आरोप आहे. गेली काही वर्षे या कंपनीतील श्री. जी. पी. गलगली आणि श्री. वालावलकर या दोन कामगार-नेत्यांच्या नेतृत्वाखालील संघटना अधिकृतपणे मान्यताप्राप्त आहे; परंतु कामगारांच्या तक्रारी जाणून घेण्यात व समस्या सोडविण्यात या संघटनेने लक्ष घातले नाही, असा कामगारांचा आरोप आहे. अनेकदा कामगारांऐवजी व्यवस्थापनाला अनुकूल असेच निर्णय या संघटनेने घेतले व त्यामुळे आणि एकूणच या संघटनेच्या निष्क्रियतेमुळे ही संघटना ' मालकांची संघटना ' म्हणून ओळखली जाऊ लागली.

श्री. गलगली यांच्यापूर्वी प्रसिद्ध कामगार-नेते दत्ता सामंत यांचे नेतृत्व या कामगार-संघटनेला होते. श्री. गलगली कामगारांच्या मागण्या वेशीवर टांगू शकत नाहीत, हे पाहून काही कामगारांनी डॉ. दत्ता सामंत यांना अलीकडेच, पुन्हा पाचारण करण्याचे ठरविले. याची कल्पना गलगली यांच्या मान्यताप्राप्त संघटनेस आल्यानंतर प्रतिस्पर्धी गटात संघर्षाला सुरुवात झाली.

संघर्षाची पहिली ठिणगी म्हणजे दत्ता सामंतवादी कामगार श्री. वार्डे यांचा कांजूरमार्ग रेल्वेस्टेशन जवळ झालेला निर्घृण खून. दि.२८ नोव्हेंबरला ही हत्या उघडकीला आली व त्या दिवशी कुर्ल्याच्या प्रीमियर कारखान्यात हाणामारीचे भीषण सत्र सुरू झाले. कर्मचारी आपापसात मारामारी करीत आहेत हे पाहून व्यवस्थापकांनी त्या दिवशीचे कामगार भर दुपारीच स्थगित केले. पुढे श्री. वार्डे यांच्या खुनाच्या संदर्भात तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली. या सर्व काळात प्रतिस्पर्धी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांवर हल्ले सुरूच होते व एका वृत्तपत्रीय बातमीनुसार एका पदाधिकाऱ्यास नग्न करून झोडपण्यात आले. दरम्यान मान्यताप्राप्त कामगार-संघटनेचे नेते श्री. वाय्. पी. गलगली व श्री. के. वाय. पी. वालावलकर यांना पोलिसांनी अटक केली असून सध्या ते रिमांडवर आहेत.

त्यानंतरही कामगारांमधील असंतोष व मुख्यतः अंतर्गत संघर्ष संपला नाही. प्रारंभीच्या काही दिवसांत बैठा संप झाला तर पुढे पुढे 'काम बंद'चे आदेशही कामगार-नेत्यांनी दिले. परिणामतः जिथे रोज ७४ गाड्यांचे उत्पादन होत असे तिथे फक्त ४० गाड्यांचे उत्पादन होऊ लागले. वडाळ्याच्या कारखान्यातील उत्पादनही घसरले व शेवटी कंपनीला कामकाज-स्थगिती जारी करावी लागली.

मुळात अस्तित्वात असलेला कामगारांमधील असंतोष, त्याचा प्रतिस्पर्धी संघटनांनी उठविलेला फायदा, त्यामुळे उद्‌भवलेला हिंसाचार व त्याची कामकाज-स्थगितीत झालेली परिणती, असे हे दुष्टचक्र आहे. कामगारांमधील असंतोषाची सरकारने वेळीच दखल घेतलेली नाही व त्यानंतर झालेले हिंसक प्रकार थोपविण्यातही सरकार अपयशी ठरले आहे. दशहतवादाचे प्रमाण वारंवार वाढत असून अंतर्गत संघर्षामुळे अनेक कामगारांना हकनाक हिंसेचे बळी व्हावे लागत आहे. गेल्या वर्षीच ठाणे-बेलापूर पट्टीत कुणा गवते नावाच्या कामगार-कार्यकर्त्याचा खून झाला होता व एकूणच ठाणे, बेलापूर, मुंबईतील कामगार-संघर्षात हिंसक प्रकार वाढत आहेत. कामगार-क्षेत्रातील या जुनाट समस्येवर उपाय शोधून काढणे आवश्यक आहे व सरकार त्यात महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल. दत्ता सामंत काय किंवा आर. जे. मेहता काय, कुणाच्याच दशहतवादाला भीक घालता कामा नये. पूर्वी वसंतदादांच्या राज्यात दत्ता सामंत यांना मोकळे रान होते. आता सरकार बदलले आहे व नवे सरकार दशहतवाद्यांना जरब बसवील अशी आशा आहे. हिंसक प्रकार असेच सुरू राहिले तर टाळेबंदी व संप-सत्रामुळे आधीच त्रस्त झालेला सामान्य कामगार आपल्या जीविताची शाश्वतीही गमावून बसेल. □


**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला**

लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**

लेखक : अरुण साधू । मूल्य : सात रुपये

**पूर्णिया**

लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

# चरणसिंग : व्यक्ती की विचार ?

▫ दि. २३ डिसेंबरच्या 'माणूस'च्या अंकातील डॉ. रत्नाकर महाजन यांचा 'किसान संमेलनाच्या निमित्ताने' हा लेख वाचला. चरणसिंगांचा एखादा प्रवक्ता किंवा कट्टर अनुयायी याला त्याच्या निवेदनांसाठी अगदी वस्तुपाठ ठरावा असा हा लेख आहे.

पहिल्याच परिच्छेदात 'मोरारजी–चरणसिंग–संघर्षात मुख्य मुद्दा सत्तास्पर्धा नाहीच. मोरारजींनी आपल्या काम करण्याच्या व विचार करण्याच्या शैलीने या प्रश्नास संकुचित स्वरूप दिले आहे,' असं डॉ. महाजन म्हणतात. गेल्या सहा महिन्यांतील या दोन्हीही नेत्यांचे पेच–प्रतिपेच बारकाईने पाहिले तर कोणत्याही सामान्य बुद्धीच्या माणसालादेखील हे सहज कळून येईल की, इथे सत्तास्पर्धेशिवाय दुसरा कुठलाच हेतू प्रभावी नव्हता आणि 'सत्यं वद, धर्मं चर ..' अशा उदात्त विचाराचा आव आणीत जनता पक्षाच्या कार्यकारिणीचा राजीनामा देऊन चरणसिंगांनीच या स्पर्धेला तोंड फोडलं. त्यांचे मतभेद जर सैद्धांतिक किंवा मूल्यात्मक असते तर त्यासाठी स्वतः सूरजकुंडला विश्रांती घेत राजनारायणासारख्या विदूषकाकडून हे तथाकथित सिद्धान्त आणि मूल्यं जाहीर करण्यासाठी रोज सकाळ–संध्याकाळ पत्रकार–परिषदा घेण्याची चरणसिंगांना काय गरज होती ? तसंच सतरा वेळा पक्ष बदलणाऱ्या व सतरा वेळा नवा पक्ष स्थापन करणाऱ्या माणसाजवळ सिद्धान्त आणि मूल्यं काय दर्जाची असू शकतात ? अशा माणसाचा सिद्धान्त एकच – सत्ता ! आणि या सिद्धान्तासाठी वाटेल ते मूल्य देण्याची त्यांची तयारी असते. जर चरणसिंगांचे मतभेद सैद्धान्तिक आणि मूल्यात्मक असते तर जोपर्यंत मोरारजींसारखा 'संकुचित विचाराने काम करणारा मनुष्य' (इति महाजन) पंतप्रधान आहे तोपर्यंत या धर्मराज चरणसिंगांनी मंत्रिमंडळात पुन्हा प्रवेश करण्याचा विचार करणंदेखील पापास कारणीभूत व्हायला हवं होतं; पण तसं ते झालं नाही. मोरारजींनी ताठरपणा स्वीकारूनही चरणसिंगांनी त्यांच्याकडे खेटे मारून, उपपंतप्रधानपद तरी मला एकट्याला उपभोगू द्या, अशी याचना केलीच ! ही शरणागती कोणत्याही सिद्धान्तवाद्याने स्वीकारली नसती. चरणसिंग जर खरोखरच सिद्धान्तवादी असते, खरोखरच जर त्यांनी जपलेल्या मूल्यांना धक्का बसला असता तर 'आता कोणत्याही परिस्थितीत मंत्रिमंडळात जाणार नाही,' हा चरणसिंगांनी डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात निरुपायाने घेतलेला निर्णय २९ जूनलाच घ्यायला हवा होता.

पुढल्या परिच्छेदात महाजन म्हणतात, 'चरणसिंग ही काही एक व्यक्ती नाही. तो एक विचार आहे.' हे realization चरणसिंगांनासुद्धा अजून झालेलं नसावं. कारण गेल्या सहा महिन्यांमध्ये त्यांनी जे काही केलं ते विचारासाठी आणि विचार करून केलेलं नसून केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी आणि अविचारानं केलेलं आहे. 'चरणसिंग यांच्यावरील अशा रूढ समजांवर आधारित आक्षेपांचे विस्तृत खंडन वस्तुनिष्ठपणे, प्रत्यक्ष आधारांसहित करणे सहज शक्य आहे; पण इथे ते अभिप्रेत नाही,' असं पुढे महाजन म्हणतात. ही शुद्ध पळवाट आहे. महाजनांनी आपल्या एकूण पाच कॉलमी लेखापैकी अडीच कॉलम जवाहरलाल नेहरू कसे अपयशी ठरले, हे पटवण्यात वाया घालवले आहेत. तेवढ्या जागेत महाजनांना हे विधायक कार्य करता आलं असतं. तेव्हा हे केवळ 'मला नाचायला येतं; पण त्यासाठी हे स्थळ नव्हे,' असं म्हणण्यासारखं आहे.

नेहरूंच्या अपयशी राजनीतीचा कोळसा उगाळून झाल्यावर आपण चरणसिंगांचे भाट आहोत, याची महाजनांना पुन्हा आठवण होते आणि ते एकदम प्रश्नांची सरबत्ती करतात. 'जे पक्षाने मान्य केले आहे ते अंमलात आणण्यासाठी आग्रह धरणारे चरणसिंग पक्षविरोधी कसे ठरतात ?' असं महाजन साळसूदपणे विचारतात. हे महाजनांचं प्रामाणिक मत असेल तर ती आत्मवंचना आहे, अन्यथा सामान्य माणसाच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा तो एक प्रयत्न आहे. पक्षाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आग्रह धरणारी कोणतीच व्यक्ती पक्षविरोधी ठरू शकत नाही; पण अंमलबजावणीचा स्वतः आग्रह धरून कृती मात्र काहीच न करणं किंवा केलीच तर त्यात हात पोळून घेऊन सरकारची प्रतिमा डागाळणं (इंदिराजी-अटक) आणि वर इतर पक्ष-कार्यकर्त्यांच्या आणि सहकारी–मंत्र्यांच्या अकार्यक्षमतेवर जाहीर टीका करणं मात्र निश्चितच पक्षविरोधी ठरतं. तसंच घरातली भांडणं आधी चव्हाट्यावर नेऊन भांडायची का आणि नेलीच तर ती कशी भांडायची याबद्दलही काही संकेत असतात. हे संकेत धुडकावून लावणारी व्यक्ती, मग ती किती का मोठी असेना, निश्चितच पक्षविरोधी वर्तन करते. क्रमांक तीन : पंतप्रधानासारख्या व्यक्तीच्या जवळच्या नातलगांवर भ्रष्टाचाराचे आरोप जाहीरपणे केल्यानंतर ते पुराव्यासह सिद्ध करून दाखवण्याची ही जबाबदारी जी व्यक्ती टाळते, तसंच स्वतःचीच पत्नी आणि जावई यांच्याबद्दलच्या लोकापवादांकडे जी सोइस्करपणे डोळेझाक करते अशी व्यक्ती निश्चितच पक्षविरोधी म्हटली पाहिजे. क्रमांक चार : अर्पण करण्यात आलेल्या ७७ लाखांच्या थैलीतील ५२ लाख रु. ज्या व्यक्तीला स्मगलिंगबद्दल अटक करण्यात आली होती अशा व्यक्तीकडून मिळाले असतानाही त्याचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तीला काय म्हणावे ?

तेव्हा एक तर महाजनांना या गेल्या सहा महिन्यांतील मोरारजी–चरणसिंग कलहाचे खरे स्वरूपच कळलेलं नाही आणि जर कळलेलं असेलच तर त्याच्याकडे ते हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहेत आणि वर म्हणताहेत की '...पण गैरमहत्त्वाच्या बाबींना प्राधान्य देऊन आपले स्थान राखण्याची कला अवगत झालेल्या नेहरू-पठडीतील राजकारण्यांनी बरोबर उलटे स्वरूप या संघर्षास दिले !'

किसान-मेळाव्याबद्दल श्री. महाजन लिहितात की, किसान मेळावा ही कोण्या व्यक्तीचे स्तोम वाढवणारी किंवा पक्षात फूट पाडणारी घटना नसून जनता पक्षामागे किसानांची ताकद उभी करणे आहे !' पुन्हा एकदा महाजनांच्या भाबडेपणाचा किंवा भोंदूपणाचा प्रत्यय येतोय्. किसान-मेळावा म्हणजे निव्वळ आपल्याला शेतकरी वर्गाचा किती पाठिंबा आहे, हे अजमावण्याचा आणि दाखविण्याचा चरणसिंगांचा प्रयत्न होता. इंदिराजींनी सुरू केलेल्या mobocracy या तंत्राचा हा आणखी एक दुष्ट वापर ! तसंच यामध्ये जर व्यक्तिस्तोम नसतं तर हा सर्व सोहळा चरणसिंगांच्या वाढदिवशी साजरा करण्याचा आणि त्याना ७७ लाखांची थैली

देण्याचं कारण काय? तसंच उपस्थित वक्त्यांमध्ये, एखाद्या श्रद्धांजलीच्या सभेत लागावी तशी, चरणसिंगांच्या गुण आणि कर्तृत्वाचे पोवाडे गाण्याची एवढी स्पर्धा का लागावी? आणि जनता पक्षामागे, किसानांची ताकद उभी करणे हा उदात्त उद्देश जर या संमेलनामागे असता तर मग त्या ठिकाणी जनता पक्षाच्याच पतप्रधानालाही निमंत्रण का दिलं गेलं नाही? उलट स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याचंच सूतोवाच या मेळाव्यात स्वतः चरणसिंगांनी केलं. यामागचे सिद्धांत आणि मूल्यं फक्त चरणसिंग आणि महाजनांनाच माहीत! हे सगळं काय दर्शवतं?

लेखाच्या शेवटच्या परिच्छेदात श्री. महाजन लिहितात, 'चरणसिंग जनता पक्षापासून दूर जाणे म्हणजे जनता पक्षाचा गुरुत्वमध्य ढळणे होय! ज्या दिवशी चरणसिंग जनता पक्षापासून दूर जातील त्या दिवशी पक्षाच्या झेंड्यावरील नांगरधारी शेतकऱ्याचे चित्र पुसून टाकावे लागेल!' आणीबाणीच्या काळात इंदिराजींबद्दल एक slogan फार लोकप्रिय (काँग्रेसवाल्यांमध्ये) झालं होतं. ते म्हणजे—'Indira is India!' आता काही तरी तशाच स्वरूपाचं slogan चरणसिंगांबद्दलही popular करण्याचा महाजनांचा हा प्रयत्न दिसतोय चरणसिंगांनी असे अनेक पक्ष सोडले आणि धरले. त्या प्रत्येक वेळी जर त्या त्या पक्षाच्या झेंड्यांवरील चित्रं पुसली (किंवा नवीन काढली गेली) असती तर आज बहुतेक पक्षांचे झेंडे म्हणजे बॅनरची पांढरी कापडंच झाले असते. कोणतंही चित्र काढा—कोणतंही पुसून टाका! थोडक्यात भारतीय मनाला असणाऱ्या व्यक्तिपूजकतेच्या आकर्षणातून महाजनही सुटलेले दिसत नाहीत!

हा सगळा प्रपंच करण्याचं कारण असं की, महाजनांचा हा लेख वाचून असं काही तरी वाटायला लागतं की, चरणसिंग या नावाचा कोणी तरी गरिबांचा, शेतकऱ्यांचा कैवारी या पृथ्वीवर, भारतवर्षामध्ये अवतरला होता; परंतु दुष्ट मोरारजी आणि त्याच्या बगलबच्च्यांनी या निष्पाप देवदूताचा घात करून निःपात की हो केला!

शेवटी एकच इसापनीतीमधली कथा श्री. महाजनांना सांगतो. एक अरुंद पूल होता. त्या पुलावर एकाच वेळी दोन बोकड समोरासमोर आले. दोघांचं जोरदार युद्ध झालं. एक जण खाली पडला. दुसरा विजयी मुद्रेनं पुढे निघून गेला!

**— सतीश कामत**

# शिक्षा : राज्यसभेची मंजुरी?

■ भारतीय राज्यघटना ही पूर्णपणे लोकशाही पद्धतीवर आधारलेली राजकीय यंत्रणा आहे. किंबहुना जगातील सर्व लिखित राज्यघटनांमध्ये ही आकाराने सर्वांत मोठी घटना आहे. त्यामुळे तिच्या सर्वसाधारण रचनेविषयी आपणास कल्पना असावयास हवी.

भारतीय घटनेचे मुख्य चार भाग आहेत. १ : प्रस्तावना, २ : मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे ३ : कार्यकारी, विधि व न्यायमंडळ यांच्या कार्य व अधिकारक्षेत्राची स्पष्ट विभागणी, ४ : घटनेत बदल करण्याची पद्धत. यांपैकी हे सर्व चारही मुद्दे एकमेकांस छेदक वा मारक ठरू शकणार नाहीत अशी दक्षता घटनाकारांनी घेतली आहे; परंतु शाब्दिक अर्थाच्या विविधतेमुळे यांच्यातील मर्यादारेखा अस्पष्ट झाल्या आहेत. या संदर्भात माजी पंतप्रधानास झालेली शिक्षा देण्याचा अधिकार लोकसभेस पोहोचतो काय, हे पाहणे आवश्यक ठरते.

या प्रश्नाची चर्चा करण्यापूर्वी एक ऐतिहासिक घटना पाहू. आणीबाणीच्या सुरुवातीस एका न्यायमूर्तीची ज्येष्ठता डावलून अन्य न्यायमूर्तीची सरन्यायाधीश या पदावर श्रीमती इंदिरा गांधींनी नेमणूक केली होती. त्यामुळे न्यायालयीन अधिकारात ढवळाढवळ केली गेली. त्या वेळी न्यायव्यवस्थेतील सर्व संबंधितांनी याबाबतीत आकांडतांडव केले. न्यायसंस्थेपेक्षा विधिसंस्था श्रेष्ठ ठरविल्याचा आरोप श्रीमती गांधींवर करण्यात आला. वास्तविक पाहता हा आरोप तंतोतंत खरा होता. याची कारणमीमांसा अशी की, भारतीय घटनेत, अमेरिकन घटनेत असणारी नियंत्रण आणि समतोल (Check & Balance) ही पद्धत तंतोतंत वापरता आली नाही. कारण अमेरिकेतील विधिमंडळ (Congress), उच्च सभागृह (Senet) आणि राष्ट्राध्यक्ष (President) यांना स्वतंत्रपणे एकमेकांच्या आधाराशिवाय काम करता येते. भारतीय घटनेत हे शक्य नसले तरी न्यायालयीन संस्थेसह सर्व भाग सर्वस्वी एकमेकांवर अवलंबून नाहीत. विशेषतः न्यायालयाचे स्वातंत्र्य हे कटाक्षाने अबाधित ठेवण्याची शिकस्त घटनाकारांनी केली आहे. असे असताना श्रीमती गांधींनी न्यायालयीन स्वातंत्र्यावर गदा आणली, ही गोष्ट निश्चितपणे घटनाबाह्य आहे.

नंतरच्या काळात वरील सर्व घटनांच्या भांडवलावर जनता पक्ष सत्तारूढ झाला. या सर्व घटनाबाह्य पद्धती व परंपरा मोडून काढण्याची धमक त्यांनी दाखविली; परंतु 'इंदिरा गांधींची शिक्षा' ही घटना पाहिली म्हणजे आपल्या लक्षात येते की, न्यायालयाचे महत्त्व कमी करून जनता पक्षानेही तोच कित्ता गिरवला आहे.

श्रीमती गांधींवर आरोप घटनेनुसार न्यायालयात दाखल करून त्यांना न्यायालयाने शिक्षा फर्मावण्यास हवी होती. कारण शिक्षा देण्याचा अधिकार लोकसभेस घटनेने कोठेही दिलेला नाही. मग लोकसभा असा निर्णय कसा घेऊ शकते व कार्यकारी मंडळ त्याची अंमलबजावणी कशी करते हे घटनेच्या अभ्यासकाला समजू शकत नाही.

पाकिस्तानात याह्याखान यांच्याकडून जेव्हा सत्ता हिसकावून घेऊन त्यांना अटक करण्यात आली तेव्हा सर्व लोकशाही राष्ट्रांनी एकच गवगवा केला. तसेच बांगला देशचे मुजीबूर रहेमान यांच्या हत्येबद्दलही बरेच वादंग माजले. अशी परंपरा ही अमानुष व पाशवी असल्याचा एकच दावा सर्व लोकशाही राष्ट्रांनी केला तसेच हे लोकशाहीला मारक असल्याचे मत प्रदर्शित करण्यात आले. मग भारतीयांना ही घटनाबाह्य पद्धती रुचेल काय? गुन्हेगाराला शिक्षा झाली पाहिजे यात कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही; परंतु लोकशाहीत घटनेने ठरवून दिलेल्या पद्धतीने शिक्षा झाली पाहिजे, हे महत्त्वाचे आहे. त्या पद्धती कोणासही डावलता येत नाहीत. 'कायद्यापुढे कोणीही व्यक्ती श्रेष्ठ नाही,' असे वाक्य पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांनी उच्चारले खरे; पण ते वाक्य न्यायालयाने उच्चारणे आवश्यक होते. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या न्यायसंस्थेच्या अधिकारावर आपोआप मर्यादा आल्या आहेत

अशा लोकशाहीच्या परंपरा पाळण्याबाबत इंग्लंडला अग्रगण्य स्थान देणे उचित ठरते. भारतात राज्य करताना कितीही धुडगूस घातला तरी एखाद्यास शिक्षा करताना न्यायालयासमोर उभे करण्याचे नाटक करून का होईना, लोकशाही परंपरा त्यांनी कायम टिकवली.

या सर्वांचा विचार करता लोकसभेने श्रीमती गांधींना दिलेली शिक्षा कितपत योग्य आहे हे ठरवावे. आणखी एक विचार करण्याचा मुद्दा असा की, जी पद्धत वापरली आहे तीसुद्धा अपुरीच आहे श्रीमती गांधींच्या शिक्षेचा प्रस्ताव फक्त लोकसभेतच मंजूर करून घेऊन लगेच त्यांना अटक करण्यात आली; पण घटनेनुसार सदर प्रस्ताव राज्यसभेतून मंजूर करून घेणे आवश्यक होते. अशी गरज लोकसभेस का वाटली नसावी? थोडक्यात लोकसभा ही सर्वांत बलवान होऊ पहात असून पुन्हा इंदिरा गांधींचा कित्ता गिरवू इच्छिते, असे प्रतिपादन केल्यास अनुचित ठरणार नाही. मग जेथे न्यायसंस्था स्वतंत्र राहू शकत नाही, तेथे लोकशाहीस काय अर्थ उरणार?

२०।१२।७८ **राम द. खंडागळे,** बार्शी

# मोरारजींची यशस्वी चाल !

किरण गोखले

माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना तुरुंगवासाची सजा देणारा व त्यांचे लोकसभेचे सदस्यत्व रद्द करणारा ठराव लोकसभेकडून संमत करून घेण्याचा निर्णय हा जनता पक्षाचा १९७८ या वर्षातील सर्वात धाडसी व दूरदर्शी निर्णय म्हटला पाहिजे.

या खंबीर निर्णयाचे सर्वांत जास्त श्रेय जाते अर्थात पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांच्याकडे ! हक्कभंगसमितीने इंदिरा गांधींना दोषी ठरविल्यानंतर त्यांना सौम्य शिक्षा करण्यात यावी असा जोरदार मतप्रवाह खुद्द जनता पक्षातच सुरू झाला. सुरुवातीच्या काळात जरी मोरारजींनी सौम्य शिक्षेबाबत अनुकूलता दर्शविली तरी पुढे मात्र त्यांनी एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊन कडक शिक्षेबाबत आग्रही भूमिका घेतली आणि आपल्या या निर्णयात पक्षाला सामील करून घेतले. चंद्रशेखर, एस्. एन्. मिश्रा, ह. वि. कामथ, धारिया, मधु लिमये, अडवाणी एवढेच नव्हे तर अटलबिहारींनाही इंदिराजींना सौम्य शिक्षा व्हावी असे वाटत होते. चरणसिंगांनीदेखील आपल्या व भारतीय लोकदलाच्या मताबाबत उलटसुलट बातम्या प्रसृत केल्या; पण मोरारजींनी जनता पक्षातील या मवाळ गटाचा प्रभाव अंतिम निर्णयावर पडू नये याची दक्षता घेतली. जनता पक्षाच्या संसदीय मंडळाच्या शेवटच्या बैठकीत सौम्य शिक्षेच्या दुरुस्त्या सुचविणाऱ्यांना प्रखर विरोध करणारांची नावे वघितली की हे सहज लक्षात येते !

गेले काही दिवस मोरारजींच्या नेतृत्वाबाबत पक्षात असंतोष असल्याचे बोलले जात होते. आणीबाणीनंतर 'बदललेले' मोरारजी पुन्हा एकदा 'बदलले' आहेत असा सूर जनता-खासदार काढीत होते. त्यांचा हट्टीपणा, ताठरपणा, आग्रही स्वभाव पुन्हा डोके वर काढीत आहेत असा समज पसरविला जात होता; पण चरणसिंग–राजनारायण यांच्या मंत्रिमंडळाच्या राजीनाम्यांची मागणी व इंदिरा गांधींच्या कडक शिक्षेची तरतूद या मोरारजींच्या कणखर निर्णयांचा विचार करता मोरारजी पुन्हा 'बदलले' असतील तर तो बदल 'स्वागतार्ह'च म्हटला पाहिजे !

जनता पक्षाच्या स्थापनेच्या वेळी व पुढे सत्तेवर आल्यानंतरही मोरारजी हे प्रमुखतः वृद्ध कुटुंबप्रमुखाची भूमिका बजावीत होते. जनता पक्षातील घटकपक्ष सदैव एकमेकांच्या उरावर बसण्याची संधी शोधत असताना, या सर्व मंडळींना समजावून घेऊन सामंजस्य निर्माण करणे हेच त्यांचे प्रमुख काम होऊन बसले होते. चरणसिंग, राजनारायण, मधु लिमये, चंद्रशेखर, सुब्रह्मण्यम् स्वामी या लोकांना एकत्र ठेवणे ही एक सर्कसच होती व या सर्कशीचे मॅनेजर म्हणून मोरारजी काम पहात असत.

परंतु सामान्य जनता मात्र नवनिर्वाचित जनता पक्षाकडून एखाद्या तडफदार व कणखर पंतप्रधानाची अपेक्षा करीत होती. राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात जनता पक्ष गेल्या ३० वर्षांच्या काँग्रेस राजवटीपेक्षा काही तरी नवीन, भव्य, गतिमान कामगिरी करून दाखवील अशी लोकांची अपेक्षा होती. मोरारजींचा आजपर्यंतचा कारभार-नैपुण्याबद्दलचा लौकिक, बाणेदारपणा, वृद्ध वयातही त्यांनी आणीबाणी-पर्वात दाखविलेली जबर जिद्द यामुळे मोरारजी राष्ट्राला गतिमान नेतृत्व देऊ शकतील अशी लोकांची कल्पना होती; पण मोरारजी आता 'बदलले' होते. जे. पी. किंवा आचार्य कृपलानी यांच्यापेक्षा मोरारजींची प्रतिमा फार वेगळी नव्हती !

पण गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत मोरारजींनी हे जे दोन खंबीर निर्णय घेतले त्यामुळे त्यांची ही वृद्ध कुटुंबप्रमुखाची प्रतिमा झपाट्याने बदलणार आहे. पक्षातील वरिष्ठ नेते, जनताचे मित्रपक्ष इत्यादींचा विरोध, देशभर हिंसाचार फैलावण्याची भीती, यांनी घाबरून न जाता मोरारजींनी ज्या धैर्याने इंदिरा गांधींच्या अटकेचा निर्णय घेतला त्यामुळे मोरारजी योग्य दिशेने बदलत आहेत असे म्हणावेसे वाटते देशात लोकशाही असली म्हणजे गलथान राज्यकारभार व सुस्त नेतृत्वच हवे असा नियम नाही. मोरारजी याच तडफेने जर जनता पक्षाला नेतृत्व देऊ शकले तर इंदिरा गांधींच्या पुनरागमनाची फारशी काळजी बाळगण्याचे कारण नाही.

माजी पंतप्रधानांना तुरुंगवास व लोकसभेतून त्यांची हकालपट्टी या निर्णयामुळे मोरारजी एका दगडात दोन पक्षी मारण्यात यशस्वी झाले आहेत असे म्हटले पाहिजे. गेल्या वर्षभरापेक्षा आपली एक वेगळी खंबीर प्रतिमा उभी करण्यात मोरारजी यशस्वी झाले आहेतच; पण त्याचवेळी जनता पक्षाच्या 'नामर्दपणा'वर टीकास्त्र सोडणाऱ्या चरणसिंगांच्या हातातील कोलीतही मोरारजींनी या निर्णयामुळे हिसकावून घेतले आहे. लोकसभेच्या चालू अधिवेशनात इंदिरा गांधींना अटक झाली नसती, तर तेवीस डिसेंबरच्या किसान मेळाव्यात व लोकसभेतील आपल्या निवेदनात चरणसिंगांनी गांधींना मोकळे सोडल्याबद्दल मोरारजींवर सर्व खापर फोडले असते. चरणसिंगांच्या एकूण वर्तनाबद्दल जनता पक्षात सर्वसाधारणपणे नाराजी असली तरी मोरारजी 'इंदिराजींना मृदू वागणूक' देत आहेत, या त्यांनी केलेल्या आरोपाबाबत फारसे दुमत नव्हते. इंदिरा गांधींना फार काळ मोकळे सोडल्यास चरणसिंगांचीच बाजू मजबूत होईल हे मोरारजींनी अचूक ओळखले व त्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल उचलले.

### भ्रमनिराश

चौधरी चरणसिंगांबाबत जनतेच्या मनात बरेच भ्रम आहेत. आजपर्यंत चरणसिंगांची प्रतिमा 'पोलादी पुरुष' अशी जनमानसात निर्माण झाली होती. चरणसिंग हा जरी राजकारणी गृहस्थ असला

पृष्ठ २१ वर

# हक्कभंग

## काही अनिर्णित प्रश्न

वा. दा. रानडे

हक्कभंगप्रकरणी अधिवेशन संपेपर्यंत कारावास आणि लोकसभेचे सभासदत्व रद्द अशी शिक्षा लोकसभेने इंदिरा गांधींना अखेर दिली! इंदिराबाईंनी हक्कभंग केला आहे व त्याबद्दल त्यांना शिक्षा झालीच पाहिजे, याबद्दल इंदिरा काँग्रेसवाले सोडले तर बाकी सर्वांचे एकमत होते; फक्त शिक्षा सौम्य असावी की कडक असावी, याबद्दल मतभेद होते. बहुतेक सर्व विरोधी पक्षांनी आणि वृत्तपत्रांनी सौम्य शिक्षेच्या बाजूने अनुकूलता दर्शविली होती. सत्तारूढ जनता पक्षातही या प्रश्नावर मतभेद होते. बहुसंख्य सभासद कडक शिक्षेच्या बाजूचे होते. पंतप्रधान मोरारजीभाईही कडक शिक्षावाले होते; पण पक्ष बहुमताने जे ठरवील त्यानुसार ठराव मी मांडीन असे त्यांनी म्हटले होते. अखेर बहुमताच्या निर्णयानुसार कडक शिक्षेचा ठराव त्यांनी मांडला व तो पास झाला. ठरावाच्या बाजूने २७९ विरुद्ध १३८ आणि ३७ तटस्थ अशी मतदानाची विभागणी होती. लोकसभेचे एकूण सभासद ५४२. त्यांपैकी ८ जागा रिकाम्या म्हणजे उरलेल्या ५३४ सभासदांपैकी ४५४ सभासद मतदानाच्या वेळी उपस्थित होते. या महत्त्वाच्या प्रश्नावरील मतदानाच्या वेळी ८० सभासद अनुपस्थित राहतात याचा अर्थ त्यांनी आपली जबाबदारी टाळली. अनुकूल-प्रतिकूल किंवा तटस्थ यांपैकी कोणत्याच बाजूने मत देण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. यात जनता पक्षाचेही काही सभासद आहेत. कारण जनता पक्षाच्या एकूण ३०३ सभासदांपैकी फक्त २७९ च मते ठरावाचे बाजूने पडली. यावरून काही सभासद तटस्थ किंवा गैरहजर राहिले असे दिसते. दोन्ही काँग्रेस पक्षांनाही त्यांची पूर्ण मते मिळाली नाहीत. लोकसभेत इंदिरा काँग्रेस ७७ व स्वर्णसिंग काँग्रेस ६४ असे एकूण १४१ सभासद आहेत. १३८ जणांनी ठरावाविरुद्ध मतदान केले. ही सर्व मतेही दोन्ही काँग्रेस पक्षांचीच असतील असे नाही. अण्णा द्र. मु. क. चीही काही मते त्यांना मिळाली असली पाहिजेत. ठरावाविरुद्ध पडलेल्या मतांपेक्षा ठरावाच्या बाजूने पडलेल्या मतांची संख्या दुपटीपेक्षा जास्त आहे म्हणजे हे अल्पबहुमत नव्हे. गृहाच्या एकूण सभासदांपैकीही निम्म्यापेक्षा अधिक सभासदांनी पंतप्रधान मोरारजीभाईंनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने मते दिली!

सौम्य शिक्षावाल्यांच्या बाजूने मुख्यत: दोन मुद्दे मांडण्यात आले. एक म्हणजे राजकीय सूडभावनेचा वास या शिक्षेला येऊ नये यासाठी ती सौम्य असावी. दुसरा, कडक शिक्षेचे संभाव्य परिणाम लक्षात घ्यावे. इंदिरा-समर्थक अराजक माजवतील. लोकांची सहानुभूति मिळून इंदिरा गांधींचे बळ आणखी वाढेल. म्हणजे तुम्हाला जे नको तेच त्यातून निष्पन्न होणार असेल तर कडक शिक्षा कशाला? कडक शिक्षावाले केवळ सूडभावनेने कडक शिक्षेला प्रवृत्त झालेले नाहीत, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. इंदिरा गांधींना आपले काही चुकले असे वाटत नाही. एका शब्दानेही त्यांनी दिलगिरी व्यक्त केलेली नाही. त्यांचा गुन्हाही सौम्य नाही. मग सौम्य शिक्षा कशासाठी? मारुती-मोटारप्रकरणी लोकसभेत विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देण्यासाठी अधिकारी माहिती गोळा करीत असता इंदिरा गांधींनी त्यांच्या कामात अडथळे आणले, त्यांना प्रतिबंध केला, त्यांचा छळ केला! हा एक प्रकारे अधिकाराचा गैरवापर आणि भ्रष्टाचारच आहे आणि एके काळी पंतप्रधानपदी असणाऱ्या व्यक्तीने तो करावा हा सौम्य गुन्हा नव्हे! कायद्याप्रमाणे त्यांच्यावर खटले होऊन त्याचा काय निकाल लागावयाचा तो लागेलच; पण लोकसभेचा हक्कभंग हा केवळ सौम्य-तांत्रिक गुन्हा नव्हे, ही जाणीव द्यायलाच हवी आणि गुन्हेगार मोठा म्हणून शिक्षा सौम्य करणे हे तर न्यायाच्या दृष्टीने मुळीच समर्थनीय नाही!

अर्थात कडक शिक्षा देताना त्याच्या परिणामांना तोंड देण्याचीही तयारी हवी; पण परिणामांना घाबरून सौम्य शिक्षा देणेही योग्य नाही याबाबतीत जनतेच्या भावनाही विचारात घेतल्या पाहिजेत. इंदिरा गांधींविरुद्ध कडक कारवाई करायला सरकार घाबरते असा समज जनतेत पसरू लागला आहे; पण असा समज दृढ होऊ नये म्हणून निश्चित पुरावा नसताना कारवाई करणेही योग्य नाही. ती चूक चरणसिंगांनी केली आणि तेव्हापासून राजकीय क्षितिजावर इंदिरा गांधी पुन्हा दिमाखाने वावरू लागल्या. चरणसिंगांसारखी चूक मोरारजीभाईंनी केली नाही. परिणामांना भिऊन कच न खाता त्यांना समर्थपणे तोंड देण्याची तयारी त्यांनी केली. पहिले दोन दिवस झालेल्या निदर्शनात दगडफेक, मोडतोड, लूट व जाळपोळीचे अनेक प्रकार घडले. विमान पळविण्यात आले. सार्वजनिक मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर हानि झाली. सरकारने कणखरपणे पण संयमाने परिस्थिती हाताळली. शांततारक्षणासाठी आवश्यक तेवढेच बळ वापरले. सरकारची प्रतिमा यामुळे उंचावली आहे.

इंदिरा गांधींवरील कारवाईसंबंधी लोकसभेने केलेला ठराव काहीसा संदिग्ध आहे. त्यांचे सभासदत्व रद्द केले पण ते किती मुदतीसाठी त्याचा उल्लेख त्यात नाही. इंदिरा गांधींना निवडणूक लढविण्यास बंदी केलेली नाही. चिकमगळूरची किंवा अन्य जागा लढवून त्या पुन्हा निवडून येऊ शकतात. चिकमगळूरचीच जागा आपण पुन्हा लढविणार असल्याचे त्यांनी जाहीरही केले. त्या निवडून आल्यावर पुढे काय? लोकसभेत त्या प्रवेश करू शकतील की नाही? कायदेतज्ज्ञांत त्याबाबत मतभेद आहेत. काहींच्या मते त्यांचे लोकसभा-सदस्यत्व रद्द केलेले असल्याने त्यांना लोकसभेच्या कामकाजात भाग घेता येणार नाही, तर काहींच्या मते त्या रीतसर निवडून आल्यानंतर त्यांचा शपथविधी होऊन त्यांना कामकाजात भाग घेऊ दिलाच पाहिजे; तसे न केल्यास मतदारांचा आणि लोकप्रतिनिधित्वाचा तो अपमान होईल! एवढेच नव्हे तर लोकप्रतिनिधित्व म्हणून आपले कर्तव्य बजावण्यास त्यांना वंचित केल्यासारखे होईल. चालू लोकसभेची मुदत संपेपर्यंत त्यांचे सभासदत्व रद्द, असे ठराव मांडणारांच्या मनात असेल तर ठरावात तसा स्पष्ट उल्लेख असायला हवा होता. इंदिरा गांधी पुन्हा नव्याने निवडून

पृष्ठ २० वर

# ये दिवाने कहाँसे आये...

## इन्दोर येथे साधेपणाने पार पडलेले जनता युवाचे पहिले अधिवेशन

सतीशचंद्र कुलकर्णी, धुळे

नवा मनू घडविण्याचे काळाने दिलेले आव्हान खांद्यावर पेलण्यासाठी आणि त्यासाठी रचनात्मक संघर्ष करून येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी जनता युवा मोर्चाच्या पहिल्या अखिल भारतीय अधिवेशनास मध्य प्रदेशातील इन्दोर शहरात देशभरातून जमलेल्या सात हजार युवक–युवतींना प्रथम निसर्गानेच एक आव्हान दिले. धुवांधार पावसाने अधिवेशनासाठी उभारलेले 'दीनदयाळपुरम्' हे पूर्णतः उद्‌ध्वस्त करून टाकले; पण तावडतोब पर्यायी व्यवस्थाही उभी राहिली. मध्यप्रदेशाचे मुख्य मंत्री श्री. सकलेचा यांनी पू. दीनदयाळजींच्या पुतळ्यासमोर ज्योत प्रज्वलित करून अधिवेशनाचे उद्‌घाटन केले. अध्यक्षस्थानी राजमाता विजयाराजे शिंदे होत्या. अखिल भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष खा. सुब्रह्मण्यम् स्वामी, अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष खा. निर्मलचंद्र जैन मंचकावर उपस्थित होते. नेहमीप्रमाणे अधिवेशनाचा औपचारिक उद्‌घाटनसोहळा पार पडला आणि मग खऱ्या अर्थाने अधिवेशनास रंग भरू लागला.

सर्वप्रथम अधिवेशनात सामाजिक प्रस्ताव मांडण्यात आला. हा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदेश जनता युवा मोर्चाचे सरचिटणीस श्री. धरमचंद चोरडिया यांनी मांडला आणि त्यास दिल्लीच्या कु. पूर्णिमा सेठी व राजस्थानचे श्री. ईश्वर चौधरी यांनी अनुमोदन दिले. हा ठराव अधिवेशनात चांगलाच लक्षवेधी ठरला. तब्बल दोन तास ठरावावर चर्चा झाली.

या सामाजिक प्रस्तावात प्रारंभी श्री. चोरडिया म्हणतात की, अनेक समाजसुधारकांनी, संतांनी व सत्पुरुषांनी सातत्याने प्रयत्न करून सुद्धा आजही भारतीय समाजजीवनाला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक आम्ही मिटवू शकलेलो नाही, ही कठोर वास्तवता आहे. जन्म, वंश, धर्म त्याचप्रमाणे व्यवसाय या आधारावर माणसा-माणसामध्ये भेदभाव किंवा पक्षपात करणे म्हणजे राष्ट्रविरोधी कार्य आहे, असे आमच्या घटनेतही आम्ही नमूद करून ठेवले आहे. त्यासाठी कायदेकानून केले आहेत; पण माझ्या मते, अस्पृश्यता पाळणे म्हणजे केवळ कायद्याविरुद्ध केलेले वर्तन नव्हे तर प्रत्यक्ष परमात्म्याविरुद्ध, मानवतेविरुद्ध गंभीर केलेला अपराध आहे. दुःखाची गोष्ट म्हणजे स्वातंत्र्यानंतर केवळ राजकीय स्वार्थासाठी, सत्तेचे राजकारण टिकविण्यासाठी काँग्रेसने या गोष्टींचा एक साधन म्हणून, भांडवल म्हणून उपयोग करून घेतला आणि माणसातील या भीषण दऱ्या नष्ट करण्याऐवजी वाढविल्या.

### वस्ती निवडून कार्य

अस्पृश्यता पार नाहीशी करण्यासाठी काही ठोस उपाय केले पाहिजेत, यावर भाष्य करताना श्री. चोरडिया आपल्या प्रस्तावात म्हणतात की, मागासवर्गीयांना प्रगतीपथावर आणण्यासाठी त्यांना ज्या विशेष सवलती देण्यात आल्या आहेत त्या पुढेही कार्यान्वित व्हायला हव्यात. त्यासाठी शासनाकडून एक सर्वेक्षण समिती नेमली जाऊन वेळोवेळी त्या समितीद्वारा या गोष्टींची योग्य कार्यवाही होत आहे की नाही, त्यात आणखी काही सुधारणा करण्याची गरज आहे का, या दृष्टीने पाहणी करायला हवी. तसेच जिथे जिथे हरिजनांवर अत्याचार होतील तिथे तिथे शासनाकडून कठोर उपाययोजना अंमलात आणल्या गेल्या पाहिजेत, आणि त्याही विनाविलंब, तत्काळ अंमलात येणे जरुरीचे आहे; पण कायद्याच्या भीतीने सर्वच प्रश्न सुटतील असे नाही. त्यासाठी खरी आवश्यकता आहे जनजागरणाची. त्यासाठी आंतरराष्ट्रीय विवाह, सहभोजन, शिक्षणाचा प्रसार इ. कार्यक्रमांच्याद्वारा केवळ मंदिरांचेच नव्हे तर हृदयाचे दरवाजे उघडून हा जातीव्यवस्थेचा कलंक कायमसाठी म्हणून गाडून टाकला पाहिजे.

अस्पृश्यतेच्या विरुद्ध जनता युवा मोर्चाने कोणता कार्यक्रम हाती घ्यावा याविषयी मार्गदर्शन करताना श्री. चोरडिया आपल्या प्रस्तावात म्हणतात की, युवा मोर्चाच्या प्रत्येक शाखेने एक दलित, वनवासी किंवा झोपडीत राहणाऱ्या गरिबांची वस्ती निवडून तिथे नियमितपणे, दीर्घकालपर्यंत संपर्क ठेवून, संघटन करून आणि वेळ पडली तर संघर्ष करून, त्या वस्तीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहयला हवे. अन्त्योदयाच्या या कामात आम्ही सर्व शक्तीनिशी स्वतःला झोकून दिल्याशिवाय नव्या आशांना अंकूर फुटणार नाही, विश्वासाचे नवे वातावरण तयार होणार नाही.

या सामाजिक प्रस्तवात श्री. चोरडिया यांनी हुंडापद्धतीविरुद्ध युवकांनी बंड करून उठावे, महिलांना योग्य आणि समान दर्जा मिळावा याही मागण्यांचा समावेश केला होता. आपल्या प्रस्तावात शेवटी श्री. धरमचंद चोरडिया म्हणतात की, जनता युवा मोर्चा एका समतायुक्त समाजरचनेसाठी दृढप्रतिज्ञ आहे. भ्रष्ट आणि हुकूमशाही राजवट युवाशक्तीच्या धक्क्याने कोलमडून पडली हा ताजा इतिहास आहे आणि आता हीच युवाशक्ती सामाजिक बदल घडवून आणून समग्र क्रांतीचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यासाठी वचनबद्ध आहे.

सदर सामाजिक प्रस्तावावर अतिशय मोकळेपणाने चर्चा झाली. प्रस्तावात श्री. गणेश नागदरे (पुणे). प्रतिभा लोखंडे (चिंचवड), शारदासिंह चव्हाण (उ. प्र.) इत्यादी प्रतिनिधींनी काही दुरुस्त्या सुचविल्या. त्यात एक दुरुस्ती अतिशय महत्त्वाची होती--हरिजनांवरील अत्याचारात जे दोषी सिद्ध होतील अशांना निवडणूक लढविण्याच्या अधिकारापासून वंचित केले पाहिजे. ही दुरुस्ती अतिशय डोळस व परिणामकारक आहे. इस्माइल पटेल व नईम शेख या दोन मुस्लिम तरुणांनी तलाकपीडित महिलांना न्याय मिळावा म्हणून समान नागरी संहिता ठरावास आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले आणि उपस्थित प्रतिनिधींनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले. शेवटी हा प्रस्ताव मतांसाठी टाकण्यात आला आणि प्रस्ताव प्रचंड बहुमताने संमत झाला. यावरोबरच अधिवेशनाचा पहिला चरण पूर्ण झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आर्थिक प्रस्ताव मांडण्यात आला. हा प्रस्ताव अ. भा. जनता युवा मोर्च्याचे उपाध्यक्ष श्री. पद्मनाभ आचार्य यांनी मांडला आणि त्यास आ. प्रो. रामजी सिंह (उ. प्र.) व अभय भारद्वाज (गुजराथ) यांनी अनुमोदन दिले.

या आर्थिक ठरावात प्रारंभी केंद्र सरकारने भाव स्थिर ठेवल्याबद्दल आणि बजेटमध्ये ग्रामीण भागास न्याय दिल्याबद्दल केंद्राचे अभिनंदन करण्यात आले. त्याचप्रमाणे गेल्या ३० वर्षांत काँग्रेसने फक्त शहरी विकासाकडे लक्ष देऊन देशातील ७० टक्के ग्रामीण जनतेचे शोषण केल्याबद्दल धिक्कार करण्यात आला. या आर्थिक ठरावाद्वारे आठ महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या. त्यात बजेटमध्ये शेतीउद्योगास अधिक प्राधान्य मिळावे, शेतमालाला चांगला भाव मिळावा, शेतीपयोगी साधने, खते वाजवी किंमतीत मिळणे इ. कृषिविषयक मागण्यांचा समावेश होता.

## काम करण्याचा अधिकार

आर्थिक ठरावात राष्ट्रीय अन्तर्नदी परियोजनेचीही मागणी करण्यात आली. या योजनेने पूरसमस्या संपुष्टात येऊन पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न सुटेल. तसेच भारताच्या तिन्ही बाजूला असलेल्या समुद्रात तेल, खनिज, मासे इ. प्रचंड संपत्तीचे भांडार शोधून काढण्यासाठी तिन्ही किनाऱ्यांची तपासणी होणे आवश्यक आहे, असेही प्रस्तावात म्हटले आहे.

शासनाने चांगला आर्थिक कार्यक्रम स्वीकारला असला तरी त्याला गती नाही आणि ही गती प्राप्त करण्यासाठी अजून प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी लघुउद्योगांची अधिकाधिक वाढ व्हायला हवी. प्रचंड मनुष्यशक्तीचा वापर करून घेतला पाहिजे. आर्थिक धोरण आणि शैक्षणिक धोरण यांचा परस्परसंबंध प्रस्थापित झाला पाहिजे. अशा अनेकविध सूचना या प्रस्तावात उपस्थित प्रतिनिधींनी केल्यामुळे चर्चा खूप रंगली. यावेळी एक महत्त्वपूर्ण दुरुस्ती स्वीकारण्यात आली. बेकारी ही देशातील प्रमुख समस्या आहे. ही समस्या सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील असले तरी काम करण्याचा अधिकार हा मूलभूत मानला जावा, अशी जोरदार मागणी सर्व प्रतिनिधींनी केली आणि या मागणीचा समावेश आर्थिक ठरावात करण्यात आला.

आर्थिक ठराव संमत झाल्यावर राजकीय प्रस्ताव विचारार्थ पुढे आला. हा राजकीय प्रस्ताव खा. कलराज मिश्र यांनी मांडला आणि त्याला श्री. व्यंकय्या नायडू (मद्रास) व कु. मेघा ओक (महाराष्ट्र) यांनी अनुमोदन दिले. राजकीय हालचालींसंबंधात युवकांच्या भावना किती तीव्र आणि क्षुब्ध आहेत याची प्रचिती या ठरावावर झालेल्या चर्चेवरून आली.

ठरावाच्या प्रारंभी लोकशाहीची पुर्नस्थापना करण्यासाठी युवकांनी केलेल्या त्याग व बलिदानाच्या स्तुत्य कार्याचे कौतुक करण्यात आले; पण याच युवाशक्तीची नंतर जनता पार्टीकडून सर्वाधिक उपेक्षा झाल्याबद्दल प्रस्तावात अत्यंत खेद व संताप व्यक्त करण्यात आला. जनता युवा मोर्चा जनता पार्टीशी संबद्ध असूनही पक्षनेतृत्व जनता युवा मोर्च्याला, युवा संघटन म्हणून स्वीकार करण्यास असमर्थ ठरते ही आत्यंतिक दुःखाची गोष्ट आहे, असेही स्पष्टपणे राजकीय प्रस्तावात म्हटले आहे. हा प्रस्ताव मांडला जात असताना काही युवकांकडून ' इंदिराजीको फाँसी दो ' किंवा ' राजनारायणको बाहर करो ' या सारख्या घोषणा अधूनमधून दिल्या जात होत्या. काही वक्त्यांनी जाहीरपणे आपल्या भावना व्यक्त करताना ' इंदिराजींना कडक शासन व्हावे ' अशी आग्रही मागणी केली. सदर राजकीय प्रस्तावावर अधिवेशनात जोरदार चर्चा झाली. जवळ जवळ ३०० च्या वर दुरुस्त्या या प्रस्तावाला सुचविण्यात आल्या. नंतर अध्यक्ष खा. सुब्रह्मण्यम् स्वामींनी आपल्या सहजसुंदर शैलीत केलेल्या भाषणात राजकीय प्रस्तावावर मत व्यक्त केले. प्रस्तावावर होणारी चर्चा त्या दिवशी तिथेच थांबविण्यात आली आणि पुढील कार्यक्रमांना सुरवात झाली.

दुपारी जनता युवा मोर्च्यातर्फे इंदोर शहरातून निघालेल्या शोभायात्रेचे वर्णन शब्दात करणे कठीण आहे. इंदोरचे राजरस्ते इतके विस्तीर्ण असूनही त्या दिवशी रस्ते कुठे दिसतच नव्हते ! जिकडे बघावे तिकडे उत्साहाने थबथबलेली युवाशक्ती नाचताना, गाताना, घोषणा देताना दिसत होती. शोभायात्रेच्या अग्रभागी ध्वज हातात घेऊन नव्या समाजरचनेच्या दिशेने निघालेले अश्वारूढ युवक धीम्या गतीने चालत होते. मागोमाग मोटारसायकलस्वारांचा ताफा शिस्तीत पळत होता. मध्यभागी अ. भा. जनता युवा मोर्च्याचे अध्यक्ष खा. डॉ. सुब्रह्मण्यम् स्वामी उच्चासनावर बसून लोकांना विनम्र अभिवादन करीत होते. शोभायात्रेचे खरे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक राज्याचे एक एक पथक त्यात समाविष्ट होते आणि ती पथके आपापल्या भाषेतून अतिशय समर्पक घोषणा देत मार्गक्रमण करीत होती. इकडे बिहार-पथकातील तरुण म्हणायचे, ' ये दिवाने कहाँसे आये, जयप्रकाशकी भूमीसे ' तर दुसरीकडे महाराष्ट्र-पथकातील युवक घोषणा द्यावयाचे, ' ये दिवाने कहाँसे आये, शिवाजीकी भूमीसे. ' आंध्रवाले म्हणायचे, ' वैंय्याली, वैंय्याली, इंदिराको संकेलू.' ( इंदिराजींना बेड्या घाला. ) एक घोषणा मात्र सगळ्या युवकांच्या तोंडात हमखास असायची आणि ती म्हणजे : ' जनता युवा की क्या तैयारी, बच्चा बच्चा अटलबिहारी ! ' असल्या घोषणांनी वातावरणात एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाले होते. दिशा भारावल्या होत्या. प्रेक्षक मंत्रमुग्ध होते. इंदोरच्या एका दैनिकाने या शोभायात्रेचे वर्णन करताना अतिशय वेधक शीर्षक दिले होते, ' युवा भारत इंदोरके रास्तेपर. '

सतत सहा तास चाललेल्या या शोभायात्रेचे रूपांतर शेवटी प्रचंड सभेत झाले. श्री. जगन्नाथराव जोशी, खा. डॉ. सुब्रह्मण्यम् स्वामी, अकाली दलाचे खा. रामू वालिया, आ. लालमनी चौबे (बिहार), आ. रामविलास शर्मा (हरियाना), खा. व्यंकटय्या नायडू (आंध्र), खा. नाथुसिंग (राजस्थान) इ. मान्यवर वक्त्यांनी केलेल्या जोषपूर्ण भाषणांनी श्रांत युवकांचा श्रमपरिहार होऊन अधिवेशनाचा दुसरा दिवस संपला.

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी प्रारंभी आदल्या दिवशी अपुरी राहिलेली राजकीय प्रस्तावावरील चर्चा सुरू झाली आणि दोन दुरुस्त्या स्वीकारल्या जाऊन प्रस्ताव संमत झाला. राजकीय ठरावात ज्या मागण्या मांडण्यात आल्या, त्यात प्रामुख्याने पक्षाच्या एकतेला धोका निर्माण करणाऱ्या नेत्यांना वेळीच पायबंद घालणे किंवा त्यांना पक्षातून काढून टाकणे, श्रीमती इंदिरा गांधींना तसेच इतर चांडाळ-चौकडीला अटक करून तावडतोब खटला भरणे, अठरा वर्षांवरील युवकांना मताधिकार मिळणे, जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करणे, आणीबाणीतील अत्याचारांना जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा देणे, सामाजिक नियंत्रण कार्य, तसेच सत्तेत युवकांना सहभागी करून घेणे, इत्यादी मागण्यांचा समावेश आहे.

### युवा आव्हान

राजकीय प्रस्तावानंतर देशातील तमाम नवयुवकांना मार्गदर्शक ठरू शकेल असा युवा आव्हान प्रस्ताव जनता युवा मोर्च्याचे उपाध्यक्ष लालमनी चौबे (बिहार), आ. रामजीसिंह (उ. प्र.) श्री. रामनाथ वीज (दिल्ली) यांनी मांडला. संपूर्ण क्रांतीच्या दिशेने वाटचाल करण्याच्या दृष्टीने एक संघटित युवानिती तयार होण्यासाठी या प्रस्तावात काही मार्गदर्शक तत्त्वे युवकांपुढे ठेवण्यात आली. सर्व थरांतील भ्रष्टाचार समाप्त करणे, वर्तमान निवडणूक पद्धतीत सुधारणा करणे, रोजगारविन्मुख शिक्षणपद्धती लागू करणे, पब्लिक स्कूल्स् समाप्त करणे, पंचतारांकित हॉटेल्स् बंद करणे या सहा प्रमुख मागण्या युवा आव्हान प्रस्तावात करण्यात आल्या. प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सर्व प्रस्ताव संपल्यानंतर अ. भा. जनता युवा मोर्च्याच्या नवीन कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली. जनता युवाचे उपाध्यक्ष खा. कलराजजी मिश्र (उ. प्र) यांचे नाव अध्यक्षपदासाठी स्वत: खा. सुब्रह्मण्यम् स्वामी यांनी सुचविले आणि ते सर्वानुमते मंजूर झाले. या वेळी बोलताना खा. स्वामी म्हणाले की, मी दीड वर्ष अध्यक्ष आहे. एका जागेला चिटकून राहण्याची परंपरा आपल्याला निर्माण करायची नाही आणि म्हणून मी स्वतःहून या जबाबदारीतून मुक्त होत आहे. नवे अध्यक्ष खा. कलराजजी मिश्र आपल्या भाषणात म्हणाले की, राजकीय स्वातंत्र्यासाठी आम्हाला काम करायचे आहे. प्रा. सत्यदेवसिंह यांनी आभारप्रदर्शन केले.

सायंकाळी अधिवेशनाचा समारोपसमारंभ सुरू झाला. प्रमुख पाहुणे म्हणून खा. सुंदरसिंग भंडारी उपस्थित होते. आपल्या ओघवत्या भाषणात खा. भंडारी म्हणाले की, जनता पक्षाने सत्तेवर आल्यानंतर अनेक जनहिताचे निर्णय घेतले; पण दुर्दैवाने पक्षान्तर्गत चिखलफेक जास्त असल्याने हे चांगले निर्णय जनतेसमोर येण्याऐवजी परस्परांवर केलेल्या टीकाटिप्पणीच फक्त लोकांपुढे आल्या आणि त्यामुळे पक्षाचे खूप नुकसान झाले. सत्ता ही जीवनाचे सर्वस्व नसते. ज्यांना जनतेसाठी काम करायचे असते ते सत्तेवर असले किंवा नसले तरी फारसा फरक पडत नाही. जनता युवा मोर्चा राजकारणाबरोबरच सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने काम करणारी संघटना आहे.

घटकवादाच्या निमित्ताने संघावर होणाऱ्या खोटया आरोपांनी अंतःकरण व्यथित होते, असे सांगून खा. सुंदरसिंगजी पुढे स्पष्टपणे म्हणतात की, एकदा जनता पक्षाने संघाविषयीचे ठाम धोरण ठरवून द्यावे म्हणजे आमच्यासारख्यांना काही निश्चित निर्णय घेता येईल. आपल्या भाषणाच्या शेवटी खा. भंडारींनी जनता युवा मोर्च्याला हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

समारोपप्रसंगी प्रत्येकाला एकमेकांचा निरोप घेताना गहिवरून येत होते. तीन दिवसांत देशभरातून जमलेल्या युवकांमध्ये परस्परांबद्दल एक प्रकारचा जिव्हाळा, आपलेपणा, आत्मीयता निर्माण होऊन सर्वजण एका नाजुक धाग्याने बांधले गेले होते. अधिवेशनकाळात कोणालाही आपला प्रांत आठवत नव्हता, धर्म आठवत नव्हता किंवा भाषा आठवत नव्हती. ही एकात्मता हीच राष्ट्राची खरी गरज आहे.

मध्यप्रदेश जनता युवाचे अध्यक्ष श्री. मेघराज जैन व त्यांच्या सहकाऱ्यांनी अधिवेशनाच्या यशस्वितेसाठी अविरत कष्ट घेतल्यामुळे कुठलीही अडचण कोणास भासली नाही. साधेपणा पण नीटनेटकेपणा हे अधिवेशनाचे वैशिष्टय होते. जमलेल्या प्रतिनिधींमध्ये उत्साहाबरोबरच शिस्त व जबाबदारीची जाणीव प्रकर्षाने जाणवत होती. या पहिल्या अधिवेशनास महाराष्ट्रातून अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यात महाराष्ट्र जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष श्री. विश्वास गांगुर्डे, उपाध्यक्ष श्री. मधू पवार, सरचिटणीस श्री. धरमचद चोरडिया, आ. पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पवार, अच्युत हिंडे, योगेश गोगावले, किरीट सोमय्या, कु. मेधा ओक, सौ. प्रज्ञा धारप, कु. लोखंडे इ. दोनशेच्या वर प्रतिनिधींचा समावेश होता. □


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा**
**वेगळा शोध**

**प्रभावी, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**

**किंमत : वीस रुपये**

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरन्दरे

# चीन-जपान-अमेरिका

## नवी रात्र--नवे सोबती

मागील आठवडयाचा लेख छापायला गेल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी १६ डिसेंबरला अमेरिकेने चीनला मान्यता दिल्याची घोषणा झाली. आग्नेय आशियात विएतनाम, कोरिया यांच्याबाबतीत बसलेल्या तडाख्यानंतर अमेरिकेने स्वीकार केलेला हा आणखी एक मोठा पराभव. तीस तीस वर्षे वस्तुस्थितीकडे डोळेझाक केल्यानंतर जी मान्यता दिली त्यामुळे फक्त विनोदनिर्मितीच काय ती झाली.

एक जानेवारीपासून ही नवी शय्यासोबत सुरू होणार. जानेवारीत चीनचा उपपंतप्रधान आणि खरा सूत्रधार तेंग सिआओ पेंग वॉशिंग्टनला भेट देणार आणि एक मार्चपासून दोन देशांत राजदूतांची देवाण-घेवाण होणार!

### चीन–जपान–संबंध

चीन–अमेरिका संबंध एकदम सुधारण्याची सुरुवात निक्सन–किसिंजर द्वयीच्या राजवटीपासून झाली. तरीही हा निर्णय इतक्या झटपट घेतला गेला याचे प्रमुख कारण म्हणजे चीन–जपान–संबंध. जपानने मागच्या ऑगस्टमध्ये चीनबरोबर शांतता व मैत्रीचा करार केला, त्याबरोबरच चीन–जपान–संबंधात नवीन पान उलटले गेले. माओनंतर चीनच्या नेतृत्वात पहिला बदल जर काही झाला असेल, तर तो स्वयंपूर्णतेच्या माओच्या आग्रहाला आळा घालण्याचा झाला. माओला देशातीलच उत्पादन लोकसंख्येला पुरवायचे होते. त्यामुळे पृथ्वीवरील हे सगळयात जास्त लोकसंख्या असणारे राष्ट्र इतरांपासून फटकून राहिले. माओनंतर चीन मोठचा वेगाने पश्चिमेच्या जवळ सरकला. अमेरिकेशी आणि EEC शी (युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटी) व्यापारी संबंध मोठचा प्रमाणावर प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. या दरम्यानच जपानही पटावर आला. चीनला जपानशी नीट संबंध राखणे हे कोणत्याही दृष्टीने फायद्याचेच आहे. ज्वलंत आग्नेय आशियातील रशियाची ढवळाढवळ रोखण्यापासून ते भौगोलिक जवळिकीमुळे व्यापाराच्या सुलभतेपर्यंत सर्व हेतू यात तडीस जातात. जपानने आजवर व्यापार आणि राजकारण फारसे एकत्र येऊ दिले नाही. आता मात्र ते होणे अटळ दिसते; पण प्रमुख लक्ष (जपानचे) व्यापारावरच आहे. या फेब्रुवारीमध्ये २००० कोटी डॉलर्सच्या व्यापारावर सह्या झाल्या. १९८५ पर्यंतच्या व्यापाराबद्दल हा करार होता. मात्र महिनाभरातच ही मुदत १९९० पर्यंत वाढवण्यात आली आणि व्यापाराच्या रकमेत चौपट वाढ करून तो ८००० कोटी डॉलर्सवर नेण्यात आला. आजपर्यंत कोणी केले नसतील एवढे प्रचंड आर्थिक व्यवहार चीन सध्या पार पाडीत आहे आणि त्यात जपान प्रमुख साथीदार आहे. म्हणूनच चीन-जपान-करारावर रशियाने मोठ्या प्रमाणात नाखुषी व्यक्त केली.

या करारामुळे जपान चीनच्या जवळ गेला म्हणजे पर्यायाने रशियाच्या विरुद्ध गोटात सामील झाला. हे अमेरिकेला फायदेशीरच होते. जपान–अमेरिका सुरक्षा–करारामध्ये जपानच्या बरोबरीने तैवानचा प्रश्न पेटता ठेवायचा, ही जी तरतूद होती, ती या कराराने आधीच नष्ट झाली होती. या दृष्टीने आता नव्या संबंधाकडे व संयुक्त पत्रकाकडे पहायला हवे. चीनला मान्यता म्हणजे तैवानला डच्चू, हे साधे समीकरण आहे. कार्टरने हेच जाहीर केले आहे; पण हे अंमलात काही प्रमाणात आधीपासूनच आले होते.

### रशियन साम्राज्यवाद

आज जगाच्या नकाशावर नजर टाकली तर स्तिमित करणाऱ्या वेगाने रशिया एकामागोमाग एक देश घशात टाकत आहे, हे लक्षात येईल. युरोपमध्ये वॉर्सा कराराने बांधलेली राष्ट्रे त्याची अंकितच आहेत. पोलंड, पूर्व जर्मनी, हंगेरी, बल्गेरिआ, चेकोस्लोवाकिया, अल्बानिया आणि आता स्वतंत्र अस्तित्व दाखवू इच्छिणारा रुमानिया हे ते देश. हॉर्न ऑफ आफ्रिकेमध्ये ( Horn of Africa ) इथिओपिआतर्फे हस्तक्षेप, अंगोलामध्ये MPLA ला पाठिंबा, युगांडाला शस्त्रास्त्रांची मदत, मध्यपूर्वेत दक्षिण येमेनमध्ये चंचुप्रवेश, आशियातील इराणमध्ये अफगाणिस्तानच्या सरहद्दीवरून चालवलेली कुमक, अफगाणिस्तानवर पूर्ण कबजा, आग्नेय आशियात विएतनामला मदत, या सर्व देशांबरोबरच कॅरिबिअनमध्ये क्युबासारख्या देशाचा सक्रिय पाठिंबा. त्यामुळे ही चढती कमान अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांना अजिबातच सहन होण्यासारखी नव्हती. अमेरिकेचा भांडवलशाही साम्राज्यवाद जगाच्या एकेका कोपऱ्यातून पराभूत होऊन परतत असताना रशियाने आपल्या सरहद्दीवर एक कोटीचे सैन्य खडे केल्याने चिंतेत असणाऱ्या चीनची त्याला याद यावी यात नवल नाही. भूमिबलाबरोबरच प्रशांत महासागरातील रशियाचे प्रचंड आरमार हाही भेडसावणाराच प्रकार आहे. दोघांचा एकच शत्रू, या जाणिवेने प्रामुख्याने हे दोन देश जवळ आले आहेत. त्यामुळेच नॉर्थ ॲटलांटिक ट्रीटि ऑर्गनायझेशन (NATO) ला पूर्ण पाठिंबा देणे किंवा नाटोचा आशियातील सभासद म्हणून उल्लेख करणे हे उद्योग चीनने केले.

### चीनची गरज

आधुनिक तंत्रज्ञानाच्या बाबतीत चीनला जपानची व अमेरिकेची निकड आहे. तेल उपसण्याच्या क्षेत्रातही चीन स्वावलंबी नाही. तेंग सिआओ पेंगने सांगितलेल्या चतुःसूत्रीनुसार त्याला विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योगधंदे आणि राष्ट्रीय संरक्षण यात चीन पुढे आणायचा आहे. यापैकी प्रत्येक गोष्टीसाठी आज परदेशाची मदत आवश्यक आहे आणि त्यामुळे परकीय मदत मिळवता–मिळवताच रशियाच्या विस्ताराला आळा घालण्यासाठी रान उठवायचे हे चीनचे धोरण आहे. अमेरिकेने आजवर किती मित्रदेशांचे गळे कापले याची मोजदादच नसल्याने तैवानचे बुजगावणे केव्हाच बाजूला पडले. विएतनाम-

चीनचा संघर्ष धुमसतोच आहे. अमेरिका एकदा तोंड पोळल्याने जरी आता ताकही फुंकून पिणार असली तरी जपानचे तसे नाही. कोरिआचे स्थान लक्षात घेता जपानचे स्वतःचे संरक्षण कोरिआवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.

### आग्नेय आशिया

उत्तर कोरिआचा किम्–सुंग हा चीन आणि रशियापासून सारखेच अंतर बाळगून आहे. या मेमध्ये हुआकु आर्फेगने एक मिनी-जागतिक दौरा काढला होता. त्यात त्याने उत्तर कोरियाला भेट दिली. सध्या मात्र चीनने परत एकदा दोन कोरियांच्या एकीकरणाचा प्रश्न लांबणीवर टाकलेला दिसतो. आग्नेय आशियातील इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया, कंबोडिया, लाओस वगैरे राष्ट्रांची अर्थव्यवस्था त्या त्या देशाचे एखादे वैशिष्टचपूर्ण उत्पादन किंवा सर्वसाधारणपणे कच्च्या मालाची निर्यात यावर अवलंबून आहे. चीनमध्ये कच्चा माल भरपूर आहे आणि जपानकडे आधुनिक तंत्रज्ञान भरपूर आहे. या दोघांच्या प्रीतिसंगमामुळे ह्या राष्ट्रांना कठीण दिवस येणार अशी शक्यता आहे १९७२ सालापासून जपानचे आणि चीनचे संबंध सुरळीत झाले होते. तेव्हापासूनच जपानला 'साम्राज्यवादी' हे विशेषण लावणे चीनने बंद केले. त्यामुळे या राष्ट्रांनी सुटकेचा निःश्वास टाकला असला तरी आता चीन–जपान–अमेरिका हा सत्तात्रिकोण फारसा सुखावणारा नाही. एक तर चीन–जपान–प्रेमामुळे आशियातील व्यापारपेठ या देशांच्या हातून जाणे सहज शक्य आहे आणि दुसरे म्हणजे आता अमेरिकेचा प्रवेश झाल्याने शीतयुद्धाची ही भूमी होणे दूर नाही. असोसिएशन ऑफ साउथ ईस्ट एशियन नेशन्स [ ASEAN ] ही यामुळे चिंतातुर आहे. विएतनाम–चीन युद्धाला आता नवा अर्थ प्राप्त होणार. रशिया विएतनामची मदत वाढवून या नव्या घडामोडींचे स्वागत करील. प्रशांत महासागरात सध्या जेवढे अस्तित्वात आहे त्याहून अधिक आरमार ओतून आता खुल्या शस्त्रप्रदर्शनाला सुरवात होणे अशक्य नाही.

कोणत्याही देशाशी तह करताना चीन साम्राज्यशाहीला आळा घालण्याच्या उदात्त तत्त्वासाठीच तो तह करतो ! रशियाला हा सरळ टोला असतो. हुआ कुओ फेंगच्या युरोप–दौऱ्याच्या वेळीसुद्धा रुमानियात आणि युगोस्लावियात त्यानेही बरीच गडबड केली. हे दोन्ही देश स्वतंत्रपण धोरणे आखू इच्छित असल्याने दोघांनीही या भाषणांना फारशी प्रसिद्धी दिली नाही आणि हुआ-कुओ फेंग समजायचे ते समजला. जपानने सुद्धा चीनशी शक्यतोवर फक्त व्यापारी संधान बांधायचे असेच ठरवले होते. त्यामुळे त्यातील राजकीय रंगाकडे त्यांनी दुर्लक्ष केले; पण आताच्या या नव्या हालचालीमुळे जपान राजकारणात ओढला जाणे अटळ दिसते.

जपानचे राजकारणात येणे हे अजिबातच सुखावह नाही. त्यामुळे सगळा आग्नेय आशिया शस्त्रस्पर्धेत जाईल आणि संपूर्ण विभागाचा कष्टाने प्रस्थापित होणारा तोल परत बिघडेल. एक तर विकसनशील राष्ट्रांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे परवडण्यातली नाहीत आणि या बड्या राष्ट्रांच्या एकमेकांविषयीच्या असंतोषामध्ये कोणाचे तरी बाहुले होऊन रहाण्याची त्यांची इच्छा नाही.

आजवर चीनचा जगाच्या राजकीय नकाशावरचा प्रवेश अगदीच हळूहळू होत होता. झांबियाला परराष्ट्रमंत्री जाणे किंवा टांझानियात तंत्रज्ञ पाठविणे यापलीकडे ठोस स्वरूपाची भूमिका चीनने घेतली नव्हती. युरोपमध्ये रशियाने ज्यांचा भ्रमनिरास केला आहे त्यांना आपल्या बाजूला नाही तरी अलिप्त ठेवायला प्रवृत्त करणे आणि प्रामुख्याने वाटेल तेवढी किंमत मोजून पाश्चात्य तंत्रज्ञान आयात करणे इथपर्यंतच हे मर्यादित होते.

जपानशी तह करून चीनने पहिले पाऊल टाकले; पण जपान जागतिक राजकारणात अलिप्तच असल्याने त्या तहाला फारसे महत्त्व मिळाले नाही. मात्र ते सोविएत रशियाला अलग करण्याच्या वर जगभर पसरू शकेल, एवढ्या ताकदीची संरक्षणव्यवस्था बांधण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेचे पहिले पाऊल होते. तदनंतर अमेरिकेशी परत संबंध प्रस्थापित झाले, त्याने या तर्कास दुजोरा मिळाला आहे.

### ' सॉल्ट ' चे भवितव्य

या दरम्यान स्ट्रॅटेजिक आर्म्ज लिमिटेशन ट्रीटि [ SALT [ या अमेरिका आणि रशिया दरम्यानच्या करारावर पाणी फिरणार असे दिसते. करार आता होतोय, मग होतोय असे म्हणतच बरेच महिने लोंबकळतो आहे. आज अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांत जग अनेक वेळा उद्ध्वस्त करतील या ताकदीची शस्त्रास्त्रे व क्षेपणास्त्रे आहेत. त्यांच्यावर काही तरी बंधन हवे या दृष्टीतून ह्या कराराची कल्पना पुढे आली; परंतु दोन्ही राष्ट्रांत राष्ट्राध्यक्षांना अन्तर्गत विरोधाला तोंड द्यावे लागल्याने ते लांबणीवर पडत आहे. आता मात्र यांचे भविष्य अंधकारमय आहे. कारण चीनशी संबंध एवढी एकच गोष्ट रशियाला सतर्क करायला पुरेशी आहे. त्यामुळे कार्टरची विश्वासार्हता रशियाच्या लेखी तळाला गेली आहे त्यात चीन अमेरिकेशी सरळ संरक्षण करारासहच संबंध ठेवू इच्छितो. आधीच चीन आणि NATO ने रशिया चिंतेत, त्यात अमेरिका चीनला आधुनिक शस्त्रे पुरवण्याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. जपानवरही, त्याच्याच देशातून आरमार आणि वायुसेना अधिक आधुनिक करण्याचे दडपण येत आहे. जपानही चीनला नजीकच्या भविष्यात शस्त्रे निर्यात करणारच नाही असे नाही. मागच्याच लेखात म्हटल्याप्रमाणे ब्रिटन–फ्रान्सशी हेच मोठे करार झालेले आहेत.

आजवर रशिया अमेरिकेच्या आणि अमेरिका रशियाच्या हालचालींवर वचक बसवत आले आणि एक (संशयी) विश्वासही टाकत आले. आता रंगभूमीवर ड्रॅगन आला आहे आणि त्याला मानवी नियम क्वचितच लागू होतात ! ☐

---


**बगावतमें ताज टूटे यह भी तुम्हें याद होगा**

**बगावतमें ताज बने यह भी तुम्हें याद होगा...**

इराणच्या या बगावतीत कोणते ताज तुटणार आहेत ? कोणते नवे निर्माण होणार आहेत ?

**एक शोध**

**माणूस विशेषांक**

लवकरच.

लघुकथा . . .

# ते फूल अबोलीचे !

चंद्रकांत अंबाडे

'कोण हवंय, डॉक्टरसाहेब ?'

रस्त्यावरून जाणाऱ्या जोडप्यापैकी एकाने डॉक्टरांना हटकताच ते भानावर आले... आपण कुणाला शोधायला इथे आलोय हेच त्यांना जणू समजत नव्हते. तिचा आठवत होता तो फक्त चेहरा आणि त्यांनीच मनातल्या मनात दिलेलं नाव...अबोली... घरनंबर नाही, ना आडनाव नाही ठाऊक... कसं शोधायचं ? ह्याच विचारात ते फियाट बाजूला पार्क करून किती वेळ बघत उभे होते कोण जाणे; पण तेवढ्यात कुणी तरी त्यांना ओळखलेच. हो, त्याशिवाय का त्याने डॉक्टर म्हणून हाक दिली ? डॉक्टरांनी मूकपणे गाडीकडे बोट केलं न् नाकाचा शेंडा उजवीकडे वाकडा केला. तो पेशंट काही बोलायच्या आत ते पुन्हा आत जाऊन बसले व खोटी खोटी खटपट करू लागले. ते जोडपं छोकऱ्यासह फिरायला पुढं गेलं !

खरंच...कसं शोधायचं तिला ? इतके कसे वेडे आपण ? पत्ता तेव्हाच डायरीत नोंद करून का ठेवला नाही ? आता तो पत्ता केसपेपर्सच्या बंडलात वॉर्डमध्ये असेल. नसेलही, कदाचित.. हो, मृत पेशंटचे पेपर्स ते ! गावाबाहेरच्या त्या बंगल्या–बंगल्यांच्या कॉलनीत तर ते येऊन पोहोचले होते. आता तिला शोधायचं कसं ? पेशंटचं नाव ठाऊक नाही न् तिचंही नाही. नातं तरी काय समजायचं ? मृत देह ताब्यात घेतल्यावर तिनं सही केली तेव्हा आडनावातला फरक सहज ध्यानात आला होता इतकंच ? हो, कदाचित बहीणसुद्धा असू शकेल. जाऊ देत ...परत जावं का ? मग, त्या कायदेशीर लग्नाच्या त्याच्या कायदेबाज बायकोला कसं तोंड देणार ? तिची आठवण होताच डॉक्टर मनोमन घाबरले...परतण्याचा विचारच परत लावला त्यांनी. शिवाय का कोण जाणे, तिला पुन्हा भेटण्याची एक अनामिक ओढ वाटत होती. एवढ्यात त्यांना समोरून कुणी पेन्शनर म्हातारा येताना दिसला. शुभ्र कपड्यातला...ताठ मानेचा न् झपझप चालणारा...डॉक्टरांना नकळत स्वतःचीच उद्याची छबी त्याच्यात दिसली...'एक्स्क्यूज मी' करून डॉक्टरांनी त्याला थांबवून विचारलं...

'तीन-चार दिवसांपूर्वी कॉलनीत एक मयत झालीय्'

'......' – म्हातारबुवांचा प्रश्नार्थक चेहरा.

'स्कूटर ॲक्सिडेंटमध्ये एक यंग इंजिनियर गेलाय !'

'.. ...' – आता त्यांनी होकारार्थी मान डोलाविली.

'कॉर्पोरेशनच्या खास गाडीतून डेड बॉडी आली होती.'

'बरं ... तुम्हाला नेमकं काय हवंय ?'

'मला ते घर हवंय.'

'कशाला ?'

'त्या डेथ सर्टिफिकिटाबद्दल जरा चौकशी ...'

'आपला परिचय ? आपण पोलिसांकडून की, विमा कंपनी ...'

'नो ! नो ! !' डॉक्टरांनी स्वतःचं पूर्ण नाव सांगताच ते म्हातारबुवा नरमले. दिलगिरी व्यक्त करीत त्यांनी पत्ता सांगितला. इतका बरोबर की, पाचच मिनिटांत डॉक्टर जिना चढून नेमक्या त्या ब्लॉकसमोर हजर! दारावर नेमप्लेट; पण नावाआधीची चार अक्षरे एम्. आय्. एस्. एस्. ... ? आणि नावापुढची चार एम. ए. बी. टी. डॉक्टर मनाशीच चमकले. स्वतःला सावरीत कॉलबेल प्रेस केली. आता परिचय काय करून द्यावा ? आणि मुख्य म्हणजे त्या कठीण... त्या अप्रिय कटू विषयास सुरुवात कशी करावी ?

'ओहो . डॉक्टर तुम्ही ? ... या !'

दारात ती उभी होती.. तीच ती.. डॉक्टरांनी मनात जिचं नाव अबोली ठेवलं होतं तीच... तीन दिवस अन् तीन रात्री त्या बेशुद्ध जखमी माणसाजवळ बसून होती तीच...जाताना साडेनऊशे रुपये रोख देऊन गेलेली तीच ती...तेच पांढरं शुभ्र पातळ न् पांढराच ब्लाऊज...आज चेहरासुद्धा भकास पांढराच भासत होता का ?

'कमिन् प्लीज्...डॉक्टर.'

तिने दुसऱ्यांदा बोलावताच ते भानावर आले. आत जाताच सोफ्याकडे अंगुलिनिर्देश करून ती सैपाकघरात गेली......खोली छोटीशीच. स्वच्छ...सुबक, नेटकी...टेबललॅम्प जळतोय...समोर मोठ्ठा वह्यांचा गठ्ठा ...कसल्याशा उदबत्तीचा सुवास जाणवतोय ...ती आत जातांना पाठमोरी तिला पाहून घेतलीय...बांधा उत्तम...वयाचे मानाने खूप खूप उत्तम...किती वय असावं हिचं ?...ते जाऊ देत...आता मुख्य मुद्द्याला तोंड कसं फोडावं...ती लंगडतेय थोडीशी...अन् भिंतीचा आधार घेत आत गेलीय हे डॉक्टरांनी ओळखलं ..म्हणजे अपघात झाला तेव्हा मागील सीटवर स्कूटरवर तीच होती तर ! याचा अर्थ, त्या कायदेशीर पत्नीचा अदाज बरोबर ठरला म्हणायचा; पण तिचं प्रत्येक वाक्य बरोबर म्हणता येईल का ?... एवढ्यात ती अबोली ट्रेमध्ये एकच ग्लास घेऊन आली...शांत धीमी पावले टाकीत... पण सुतकात कसल्या फॉर्म्यालिटीज ?...पण सुतक केव्हा...? नातेवाईक गेला तर ?... मग त्या गेलेल्याशी हिचं नातं काय ? तिने ग्लास त्यांच्यासमोर ठेवला अन् समोरच्या सिंगल सोफापीसवर ती बसली...शांतपणे ... फिरत्या फॅनकडे शून्यपणे पाहात. आता बोलणं सुचेना जणू कुणालाच. डॉक्टरांनी मूकपणे तो ग्लास उचलला नि एकच घोट घेतला...ते स्वच्छ थंड पाणी होतं...अगदी नळाचं साधं ताजं पाणी...तिच्यासारखंच साधं ?

'माझ्याकडनं एक चूक झाली म्हणून आलो' –डॉ.

'.. ...' तिने फक्त शून्यपणे नजर वर

केली.

'तीन दिवस अन् तीन रात्री तुम्ही पेशंट-जवळच होतात. हवं-नको पाहात होतात... भराभर औषधं मोसंब्या—ग्लूकोजसाठी पैसे दिलेत.. ब्लडसाठी पैसे दिलेत...शेवटच्या दिवशी बिल तयार नव्हतं तर साडेनऊशे न् काही पैसे अॅडव्हान्स भरलेत... '

'बिल जास्त झालंय? किती तेवढे बोला!'

'डोंट मिस्टेक मी.. उलट आमचा कॅशियरच तीन-चारशे तुम्हाला परत करील,हिशोब झाल्यावर...तुम्ही खूपच जास्त भरलेत'

'आय् सी !'

'तर तुम्ही जेव्हा डेड बॉडी पुढच्या विधीसाठी ताब्यात घेतलीत ना, तेव्हा केस-पेपरवर सही केलीत, त्याच वेळी डेथ सर्टिफिकेटपण आम्ही देऊन टाकतो...नाही तर स्मशानात ते अडवतात कधीकधी...तर मी तेव्हा गडबडीत तुमची सही वाचलीच नाही!'

'वाचली असती तर ?.. डेड बॉडी दिली नसती ?...भरलेलं बिल परत केलं असतं ? ...पेशंटची शुश्रूषा करू दिली नसती ?.. '

'रागावू नका...डेड बॉडी आम्ही कायदेशीर वारसालाच शक्यतोवर .. '

'मग त्यांचे कायदेशीर वारस तीन दिवस कुठे होते ?'

'मला नाही ठाऊक...कालपर्यंत, नव्हे आज दुपारपर्यंत ठाऊकही नव्हतं...कदाचित परगावाहून यायला वेळ लागला असेल...'

'एका पेठेतून दुसऱ्या पेठेत जायला...? जवळ कार असताना ?'

'माहिती नव्हतं म्हणाल्या त्या...शोधत होतो म्हणे तीन दिवस !'

'बरं. ते जाऊ देत...प्लीज कम् टू द पॉइंट स्ट्रेटवे'

'ते डेथ सर्टिफिकेट बाईंना हवंय...विम्यासाठी, प्रॉव्हिडंड फंडाला... '

'मग द्या ना त्यांना...कायदेशीर पत्नीचा तो हक्कच आहे.'

'तर ते चुकून तुम्हाला दिलं गेलंय म्हणून...'

'मग डुप्लिकेट इशू करा त्यांना !'

'त्यांना ओरिजिनलच हवंय...प्लीज, माझं ऐका...केस करते म्हणे हॉस्पिटलवर की, डेड बॉडी भलत्या बाईला दिली म्हणून... नि वारसांना डेथ कळविला नाही म्हणून.... अॅडमिट केलेलं कळवलं नाही म्हणून '

'हा डॉक्टर, अॅडमिट केल्याचं दोन तासात मी कळवलंय न् फोन मीच केला... तुमच्याच टेबलावरून अन् तिनंच घेतला तो...'

'खरं म्हणता की काय ?'

'शिवाय घरचा ड्रायव्हर, माळी नि मोलकरीण बघून जायचेच रोज!'

'बरं, डेड बॉडी तुम्ही कुठे नेलीत...त्या घरी की ह्या ?'

'लॉजवर...तिथंच रहायचं ते...वर्षापास्नं.'

'का? म्हणजे गावात घर असून लॉजवर ?'

'बाईसाहेबांनी घराबाहेर हाकलून दिलं होतं ना नवऱ्याला !'

'माय गॉड !'

'अक्षरशः एका वस्त्रानिशी, रेल्वेफलाटावर झोपला हा गृहस्थ दोन दिवस...स्नान केलं तर बदलायला अंडरपँट नव्हती... शब्दशः एका वस्त्रानिशी घराबाहेर पडला हा, ते काय वेड लागलं म्हणून ?'

'मग ?'

'त्यानंतर तो प्रथम माझ्या घराची पायरी चढला...अन् तोवर पाणीदेखील घेतलं नव्हतं माझ्या हातनं !'

'म्हणजे, तुमच्या नादी लागून घर सोडलं ते खोटं तर !'

'ती कायदेशीर बायकोची कायदेशीर थाप...बरं, डॉक्टर लेटस् स्टॉप इट...ते सर्टिफिकेट मी घेतलंच नाहीय...त्या ड्युटीवरच्या नर्सलाच परत दिलंय...त्याच वेळी ...मला नकोय ते...लॉजचं बिल चुकतं केलं तेव्हा प्रथम खोली पाहिली मी...त्या सामानात एक कोरं मंगळसूत्र मिळालं...ते मोडून मी तुमच्याकडेच देईन...बँकेत फिक्स्डमध्ये सारी देणगी म्हणून ठेवा... असाच कुणी बेवारशी अॅडमिट झाला तर त्याच्या खर्चासाठी विनियोग करा कॅशियरला बॅलन्स परत करू नको म्हणावं... ओ. के. !'

बोलता बोलता ती उठली न् दरवाज्यापर्यंत जाऊन हळूच तिने दरवाजा उघडला .. यंत्राप्रमाणे डॉक्टर उठून बाहेर आले. तिला ते अबोली समजत होते ती बोलू लागताच खुलासा झाला होता. स्त्री इतकी कठोर होऊ शकते का ?...आणि कायदेशीर पण ? आणि नि.स्वार्थी प्रेमाला कायदा काय बंधन घालू शकतो ? आपल्याच विचारात जिना उतरून ते गाडीपर्यंत कधी आले ते त्यांचे त्यांनाच समजले नाही...अंधार दाटला होता...बागेतली अबोली कोमेजली होती. □


**'निक्सनचा अधःपात' आणि 'हुकुमशहा स्टॅलिन'**

पृष्ठे २५० : किं. १६ रु. पृष्ठे ४५० : किं. ३५ रु.

**लेखक : र. धों. घाणेकर,** बी. ए., एल्‌एल्. बी.

इंदिरा गांधींची राजवट कशी होती व कोणत्या थराला जाणार होती हे समजून घ्यावयाचे असेल तर ही दोन पुस्तके अवश्य वाचा. 'माणूस' साप्ताहिकाच्या वर्गणीदारांना ही दोन्ही पुस्तके रु. ३५ ह्या सवलतीच्या किंमतीत विकत मिळतील.

संपर्क साधा : स्वाध्याय महाविद्यालय

५६७, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

पुस्तके

# विद्रोही कविता

## सर्वांगपरिपूर्ण सुस्तीवर ओढलेले कोरडे !

शब्द शब्द काळीज कापीत जावा अशा रास्त अपेक्षेची तीव्रतरतरीत धार परजलेल्या या पंचावन्न कविता, केवळ शब्दांच्या करामती तर नाहीतच, पण मधुरमोहक भावनिक लाटालाटांचे गुंगवणारे नर्तनही इथे नाही, किंवा भव्यदिव्य साक्षात्कारातून अवतरलेल्या अस्पष्ट, अमूर्त, गूढ प्रतिमांचा हा खेळ नाही. हे शब्द आमच्या घराबाहेरचे—म्हणजे, रस्त्यावरचे देखील नव्हेत. ते सडके, कुजके, नासके. मग तो समोरचा उकीरडा आमच्या स्वच्छ निरोगीपणाचे तेज चढलेल्या घरात कसा घ्यावा ? म्हणजे तसे आम्ही काही 'कूपमण्डूक' नाही—आमची वृत्ती 'व्यापक, उदार' (वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि !) म्हणून तर या 'आगी' चा आणि आपला 'आदिबंध' आहेच ! तशी ती 'नवीन, नूतन, आधुनिक' वगैरे नाही. प्रसंगोपात्त आपलेही लाभ-नुकसानं तिच्यामुळे झालेली आहेत ! चार पावलं लांब उभं राहून (कलात्मक ?) अलिप्ततेनं बंडखोर शब्दांचाही माफक शिडकावा केलेला आहे. याहून अधिक आपण काय करू शकतो ? अखेर आपली पुरातन लाडकी परंपरा, रूढी, संकेत यांच्या दाट(वाटणाऱ्या!) छायेत आपण उभे ! पण आपल्या ताठरतेला तेव्हा जमिनीनं गुमान साथ दिली. आज तिचंच इमान तुटलंय्. धरणीमातेचा वरदहस्त ढासळलाय, पावलाखाली उद्ध्वस्त खिंडारं आहेत तर जाणार कुठे? बंद दरवाजाआड 'काडी न पडेल' अशी हमी देता येईल? दाराआड जीव मुठीत घेऊन कोंदटपणात सुखी रहायचं ? की वाकड्या वाटा जिद्दीनं तुडवायच्या ? विद्रोहाच्या ज्वाळा दुरून पहायच्या की त्यातच लोटून द्यायचं ? कदाचित आपण मातीत जाऊ, कदाचित तावूनसुलाखून निघू ! 'दीप्ति चे' डोहाळे ज्यांनी कधी अनुभवलेच नाहीत त्यांनी मात्र अंमळ सावध असावं ! विद्रोहाचा वणवा चहु बाजूंनी पेटलाय्. तो तुम्हाला तुमच्या नकळत ग्रासून टाकील आणि मग तेव्हा जर्जर महनीयतेचा डांगोरा पिटण्याइतकाही खणखणीतपणा आवाजात उरलेला नसेल ! आणि मोठा आवाज हेच तर आपलं बलस्थान — त्यानंच दगा दिला तर— !

आजपर्यंत-अगदी या तासापर्यंत जपलेल्या आणि पूर्वजांकडून कमावलेल्या व्यावहारिक चातुर्याच्या आणि भुसभुशीत सराईतपणाच्या चिंधड्या उडवणाऱ्या या कविता — केवळ नजरेखालून सरकत नाहीत किंवा फक्त अंतर्मुखतेच साजरं समाधानही वहाल करीत नाहीत. 'काळ्याठिक्कर रक्तात भिजून आलेले हे शब्द' अक्षरशः अंगावर चाल करून येतात आणि आपल्या अंगानं जपून ठेवलेली पोकळ परंपरांची 'चिलवटलेली चिरगुटं' फाडून फेकून देतात. मग आपलं उघडंबोडकं केविलवाणं रूप बघायचं धाडसही आपण करू शकत नाही; पण आता हे अपरिहार्य आहे.—कारण धूसर धुकेदेखील वेगाने सरते आहे. तुमचे बेगुमान हुकूम पाळण्याइतकं तेही आता सहनशील, सोशिक राहिलेलं नाही आणि प्रकाशाच्या किरणांनीही शहाणपण पचवलंय—कारण त्यांना माहित झालंय की 'उद्याच्या सूर्याचं वाळंतपण' झालं तर 'तिला चोळी-बांगडी करण्याचं सत्कार्यही' याच पडक्या, अपमानित उद्ध्वस्त झोपड्यांतून होईल. घामाचे घोट रिचवून, ओठात नकार, डोळ्यांत अंगार ओतून ह्या कोवळ्या किरणांचे ज्वलज्जहाल बहिष्कृत स्वागत होईल; पण ते अस्सल असेल, शंभर नंबरी असेल ! कारण त्याचं पाठबळ 'मोठं' आहे—त्याची आपण कल्पनाही करू शकत नाही. म्हणूनच 'विद्रोही कविता'त केवळ वेदनेचा, संतापाचा सूर आहे' असं म्हणून स्पष्टीकरण देता येत नाही. या सगळ्या कवितांपाठीमागे एक विलक्षण उदासीनता आणि आवेग (विराट ?) आहे आणि या दोन्हीत, एरवी क्वचितच आढळणारी (विशेषतः 'अशा अभिव्यक्तीत !') करडेपणातील जरब आहे. ही जरब आपल्याला खिळवून ठेवते. मग कधी ती, 'गावकुसाबाहेर डोळ्या'त न मावणाऱ्या अनंत फाटलेल्या हृदयां'च्या आणि 'चिमण्या वाळांच्या किंकाळ्यां'च्या आधाराने 'जपून ठेवली आहे.' (वामन निंबाळकर) तर कधी 'महारासी अंती नाही लढल्याविण मुक्ती' (किसन फागुजी बनसोड) अशा छंदोबद्ध आवालसुलभ ठेक्यातून ती संयमित सूचकरूपाने प्रकटली आहे. क्वचित 'आता स्वप्नांचा लाचार आधार तुला नको, धुक्यातील इंद्रधनुष्य बहार तुला नको' (अमरशेख) असा या व्यथेच्या वाटचालीला झालेला चैतन्याचा सरसरता स्पर्शही जागवून जातो—आणि मग या करडेपणातच सगळे नेटके ठसे अधिकाधिक उजळत जातात.

'पाठिशी विराट ओझे दुःखाने बधिर गात्र
दास्याच्या अंधारातून कोटिशः शरीरे जात

पण अशा अंधाराला कापत जात असताना, कर्माच्या चरकात पिचत असताना—देखील जुनाट इमला धक्का देऊन पाडून टाकण्याइतकी ताकद या वाळलेल्या, शुष्क शरीरात आहे.

'हेच ते माझे डोके आज अक्कल पिकवीत आहे
जे वाहात होते तुमच्याच विगारीचे ओझे
हेच ते माझे मन आज स्वाभिमानानं तळपत आहे
जे तुमचेच मिंधे अन्न खाऊन मेले होते'...
('आज')

आता ही नजर कोणाच्याही दवावाखाली झुकलेली रहाणार नाही. कारण 'आकाशव्यापी वेदना किती दिवस कोंडून ठेवणार ?' (रहाणारच नाही !) आणि ती भीक मागत नाही किंवा खोटचा, तकलादू मलमपट्ट्यांसाठी हातही पसरत नाही, म्हणूनच पोचट विवशतेने ती बरबटलेली नाही— विद्रोहापाठीमागे असलेला हा वेदनेचा चढा स्वर म्हणूनच कर्कश वाटत नाही, तो स्वाभाविक

वाटतो आणि म्हणूनच ही वेदना समजावून घेताना विचार करावा लागतो. केवळ सुस्कारे टाकून, हळहळ वाटून तिचं आवाहन संपत नाही. ही वेदना कोणा एकाची नाही, ती सगळ्या वस्तीची आहे. (या वस्तीची रौद्र-भीषण रूपे 'गोलपीठा' किंवा 'उत्खनन' मध्ये पहावीत म्हणजे हे सगळंच किती कठीण आहे ते थोडं बहुत समजेल.) उभं आयुष्य तुरुंग समजून सहनणारा' हा विराट जन-समुदाय आपल्याला नकोनकोसा वाटावा यात नवल नाही. कारण दडपलेले श्वास मोकळे होऊन आपल्यालाच जाब विचारणार आहेत. आता हे लाल, उष्ण रक्त मातीतून उगवून मातीत मावळणार नाही, त्याला मातीची मातब्बरीच नाही. कारण 'शहराच्या नाक्या-नाक्यावर फूत्कारणाऱ्या रक्ताची कारंजी' उडताहेत. मग सुबक मोहक घरांना, आखीव-रेखीव रस्त्यांनी, रम्य स्वैर बाग-बगीच्यांनी आणि सभ्यसंभावित देहांनी तरी निर्धास्त निर्विकार कसं रहावं? की निराकार निर्गुण विघ्नहर्त्यावर भार टाकून रिकामं व्हावं? पण तो तरी काय तापहरण करणार? कारण

'आम्ही गॉड मेकर
देतो नोटीस तुझ्यावर
निग्लिजन्स ऑफ ड्युटीची
('त्याच्या पाळण्यासाठी')
युवर सर्व्हिस इज नॉट रिक्वायर्ड'

अशी सक्त ताकीद पूर्वीच दिलेली आहे.

पण आमच्याही धमन्याधमन्यांतून अट्टल पिढीजात घुमेपणा इमानानं वाहतो आहे. तशी उजळणारी कपाळं आतापावेतो आमच्याही जीवनात (नाइलाजास्तव) स्वीकारली गेली. म्हणजे आमच्या घरांची सजावट त्यांनीच तर केली. कितीएक अत्याचारातली रम्य-भीषणता म्युझियम्स समृद्ध करून गेली, 'चित्र'रूपाने रंजक झाली. सजवलेल्या विजवर शब्दांनी पुरातन 'पिंपळवृक्ष' डेरेदार केला. लोकशाहीचा भरदार फुलोरा नेकीनं फुलवला. या 'कावेबाज अभिनयसम्राट वल्गुल्या' इथल्या दिशांनीही कौतुकानं साग्रसंगीत न्याहाळल्या. (या सुस्त दिशांना यशवंत मनोहर यांनी मारलेले फटकारे आपल्याच पाठीवर एकेक वळ उमटवत जातात इतका त्वेष, कमालीचा आवेग त्यात आहे. ही संपूर्ण कविता सगळ्या शहाजोग सुप्तीला, संपन्नतेला चूड लावणारी आहे.) पण आता हा निगरगट्ट निष्णातपणा पोखरला जातोय. कारण 'जुलूमग्रस्त भाळा-वरील लाचार तगमग पुसली जातीय.' आता 'निळ्याभोर आभाळाला कवेत घेण्यासाठी' धडपडण्याइतका कोणी नवथर नाही. तो 'पिंजऱ्यातला पक्षी' आहेच कुठे? तुमचे कसबदार सापळे आणि रंगीबेरंगी जाळी टिपण्याइतकी तीक्ष्ण, धारदार नजर 'पाखरां'ना आलेली आहे. म्हणूनच

'समतेचं वारं प्यालेली पाखरं... त्यांना
असं डांबू नका
तुरुंगासह ती उडून जाणारच नाहीत अशा
भ्रमात राहू नका.

अशा प्रखर इशाऱ्याला उधाण आले आहे. इथल्या रात्री 'घुम्या' असल्या तरी ओठ 'उष्ण'च आहेत! ह्या उष्णतेचं तपमान मुळातच इतकं आहे की, ते मुद्दाम आवर्जून जपावं लागतच नाही.

अखेर दुःख रंगवून रंजक करणाऱ्या गुंजन-वादी कुळाचा' त्याच्या मृदुमुलायम सौंदर्याचा वारसा घेऊन ही अनुभूती साकारलेली नाही. म्हणूनच उद्ध्वस्त, उदासवाण्या स्वप्नांच्या दवादारूचे घुटके घेत ती विसाव-लेली नाही. ही स्वप्नं कुरवाळणं तिला परवडणार नाही. (अशी धुंदी, बेहोषी खास आपल्यासाठी!) बंद दाराआडून, झरोक्या-तून आत येणाऱ्या चंद्रप्रकाशाची चैन करणं ही आपल्या आयुष्यातली (कलात्मक?) अपरिहार्यता! जिथे दुःख, दैन्य आणि दारिद्र्यच फोफावलेलं आहे, जियं आयुष्य-भर रावणं आणि खपणंच माथी मारलेलं आहे, ज्यांची पावलं धक्क्यांनी कायम भेल-कांडतच राहिली त्यांच्या दुभंगण्याला जबाबदार कोण? ही बर्बादी आता पिसाळली—तिनं हरामखोर परंपरांवर विध्वंसाचा नांगर धरला आणि तथाकथित सभ्यता शिलगावली तर आपल्या नाठाळ ओठांची अजूनही हालचाल का होते? त्यांचा ताठपणा आपल्याला पोकेपण का आणतो? की 'अंधाराला फुटलेले डोळे' आपण पाहिलेलेच नाहीत? ते डोळे क्षीण, क्षुल्लक नाहीत. (मॅच्युअर आहेत.) आपली नजर लडबडलेली आहे. कारण 'अविश्वा-साचे धावरे ढग' अजूनही डोळा दाटून आलेलेच आहेत आणि नेत्र 'विघातक वैरी' आहेत, पण आपण तरी काय करू शकतो? अप्रामाणिकपणा जोपासणारे ग्रीष्मच आम्हाला 'चंदन' गंधाची शीतळता देतात आणि सृष्टीचा हा विद्रूप विकासच आम्हाला आदर्श वाटतो. आमच्या भूमिका पुरेशा लव-चिक आहेत आणि आमचे डोळे—निस्तेज थंडपणा हेच त्यांच्या सौंदर्यपरिपूर्णतेचे लक्षण आहे; पण आपल्या दुनियेच्या बेगडीपणातली ही आकर्षकता आता अबाधित रहाणं अशक्य आहे—इव्हन 'चिमण्यां'नी देखील टोची मारून तिला अर्धीअधिक उसवलीय!

उच्च—उदात्त विचारांच्या रांगोळीनं सजवलेले आपले सगळे साचेबंद सौख्याचे उरूस मुळापासून उखडून टाकणारे हे शब्द आपल्याच ठरीव ठाशीव अनुभूतींना थकित्त करतात. (वास्तविक या सत्तावीस कवींनीच इतकी 'आगाग' लावली असताना प्रस्ता-वना—परिचय—स्पष्टीकरण यांच्या उबदार-पणाची गरजच काय? हा वणवा न्याहाळण्या-साठी त्याची—विशेषतः 'संसूचक, स्फूर्तिदायक उल्लेखयुक्त' स्पष्टीकरणे आणि लौकिक मिळकत माहीत करून घेण्याची. आवश्य-कताच काय? तेव्हा हे सगळं आपण सोयी-सवडीनं नंतरच वाचावं. मी स्वतः तसाच क्रम ठेवलेला आहे. सारांश एवढाच निघतो की हा 'विद्रोह' पुढेमागे, अकाळविकाळ परीक्षेसाठी, विराट जनसमुदायाला पाठ्य-पुस्तक म्हणून नेमले जाण्याचा धोका संभ-वतो. कारण कुशल संपादन+विवेचक टीपा+परिचय!) आणि आपल्या साऱ्या विचारांसकट मळमळून येतं. कारण तुमच्या-पैकी कित्येक मनांच्या कंगोऱ्यात

अजून आहे दडलेला
इंचभर तरी 'पुरीचा शंकराचार्य'
येतो उफाळून कधी कधी तो वर
द्वेषाच्या अग्नीने
'दिवाळीतला साप जसा व्यक्त होतो
विराट रूपात
लहान मुलाने लावलेल्या पेटत्या काडीने'

('बलुतेदार') हे संपूर्ण टळटळीत सत्य आहे. आता फक्त मोठ्या आवजानं ते नाकारायचं की क्षीण आवाजात कबुली द्यायची तेवढंच नीट ठरवायचं आहे आणि तेही आपल्यासाठीच! कारण वेशीच्या आत घुसणारा विजेचा लोळ तुमच्या-आमच्या आवाजाचीही फिकीर कर-

णारा नसेल. 'नसावा' असं मात्र मनःपूर्वक वाटतं–ते 'वाटणं'ही तितकंसं महत्त्वाचं नाहीच. कारण धर्मराज निमसरकरांनीच बजावलेलं मनात रुतलं आहे. ज्या जगलाचे संदर्भ एकवटून आलेख काढण्याचा प्रयत्न केला त्या जंगलाचं जंगलपण प्रत्यक्षात मात्र अपरिचित आहे. तरीही अनोळखी मात्र नाही आणि इथे तर ते ठासून उपभोगलं, (कडवट शब्दांची कमाई) कारण 'सगळे संदर्भ मानगुटीवर ओझ्यासारखे लादूनच आले.' (म्हणून तर सत्तावीस कवींच्या वृत्तींचे मार्मिक विच्छेदन, 'संग्रह' म्हणून विश्लेषण, त्यातील प्रातिनिधिक आशय, प्रस्तावनेचे नेमके सार अशी अभ्यासपूर्ण आर्जं मांडणी करता आली नाही !)

**–रेखा इनामदार**

पुस्तक परिचय

# एकाकी चित्रकार निकोलस द स्तेल

निकोलस द स्तेल हा फ्रान्सचा, नव्या पिढीचा अमूर्तवादी चित्रकार. त्याच्या शांत, एकाकी, काहीशा संन्यस्त पण जीवनोत्सुक अशा जीवनक्रमाचे डेनिस सटन या लेखकाने 'निकोलस द स्तेल' या छोटेखानी पुस्तकात वर्णन केले आहे. त्याच्या जीवनातील आशा-निराशा, त्याची रंगांविषयीची अपार आसक्ती आणि चित्रे काढून स्वतःला रिते करीत करीत शेवटी होणारा त्याच्या आत्महत्येपर्यंतचा प्रवास त्याने सहजपणे रंगविला आहे. सोबतचा लेख हा त्याचाच अनुवाद आहे.

दिसायला उंच, काहीसा विनोदी नि थोडासा विक्षिप्त प्रकृतीचा कलाकार निकोलस द स्तेल. एका जनरलचा मुलगा. पीटसबर्गमध्ये जन्मला. कधी शांत वृत्तीचा तर कधी चढाईखोर. आपल्या आवडी-निवडी बोलून दाखविणारा. चित्रमय शब्दसृष्टी अंगी लाभलेला. त्याच्या मते, आजच्या चित्रकाराला फक्त चित्रे काढून भागत नाही तर कलेचे जग, कलासमीक्षक या सर्वांकडेच लक्ष द्यावे लागते ढोंगी माणसांचा मात्र तो सतत विरोधी असायचा. भावनांची मृदुकोमलता जपणारा, मित्रांचे प्रश्न आणि प्रयत्नांची जाण बाळगणारा, अत्यंत मायाळू स्वभावाचा, स्वतःच्या दुःखाच्या अनुभवावरून इतरांची सहानुभूती बाळगणारा असा हा कलावंत. जेवढ्या शुद्धतेने तो आपली ठाम मते मांडी तेवढाच कधी कधी वैतागाने कलाचर्चेतून आपले अंग काढून घेई. स्वतःच्या पूर्वायुष्यातल्या संकटांमुळे कधी कधी तो बोलायलाही नाखूष असे. त्याला आपल्या आवडत्या मैत्रिणीचा, आजारीपणामुळे निकृष्ट अन्नावर जगावे लागणाऱ्या जेनी तेव्हलरचा, मृत्यू पहावा लागला आणि एवढ होऊनसुद्धा कुठल्याही क्षणी हातात घेतलेले काम त्याला अत्यंत महत्त्वाचे वाटे. जणू अत्यंत मर्यादित अशा कालात त्याला महत्त्वाची अनेक कामे पूर्ण करायची होती.

निकोलस द स्तेल १९१४ साली जन्मला. लहानपणी तो अनाथ म्हणून वाढला. १९२१ त त्याचे वडील वारले नि १९२२ त त्याची आई ! आपल्या दोन बहिणींबरोबर तो ब्रुसेल येथे वाढला. लहानपणापासून ग्रीक शोकांतिकेचा त्याच्यावर फार प्रभाव पडला. या पार्श्वभूमीवर आणि कलेकडे असलेल्या त्याच्या ओढ्यामुळे युद्धानंतर निकोलसने खूप प्रवास केला. सिसिली बेटात त्याने जीवनातील काही उत्साहाचे नि आनंदाचे दिवस घालवले तो एक संवेदनाक्षम प्रवासी होता. हॉलंडमध्ये त्याने डच-चित्रकलेचा अभ्यास केला. परत ब्रुसेलला आल्यावर त्याला मुलांसाठी एक शाळा सजवायचे काम मिळाले. १९३० त त्याने पुन्हा खूप प्रवास केला–युरोपमध्ये दक्षिण आफ्रिकेत नि नंतर इंग्लंड–अमेरिकेत. निकोलसचा कलाविषयक नवा दृष्टिकोन त्याने केलेल्या स्पेन व इटली या देशांच्या सफरीमुळे त्याला लाभला. १९३४ मध्ये उत्तरेतले हवामान त्याला आवडले. १९३६त त्याने मोरोक्कोला भेट दिली. नंतर अल्जेरियात नि नेपल्समधल्या प्रवासात तिथल्या काहीशा उदास वातावरणाने तो मोहून गेला.

पॅरिसमध्ये निकोलस १९३८ त जेनी तेव्हलर या सहचरीसमवेत स्थायिक झाला. या काळात त्याने फर्नांड लीगरच्या स्टुडिओत काम केले. यांत्रिक युगाच्या प्रवृत्तीचे लीगर या चित्रकाराचे काही अवशेष सुरुवातीला त्याच्या चित्रात दिसत. १९१९ पर्यंत त्याने स्वतःची अशी चित्रशैली निर्माण केली नव्हती. त्याच काळात निकोलसने आपली बरीचशी चित्रे स्वतःचेच कठोर आत्मपरीक्षण करून नष्ट करून टाकली. या काळात तो शिकत होता. हळूहळू त्याला चित्रांची समज येत होती.

युद्धातही निकोलसने काम केले. १९४० त तो नीस गावी स्थायिक झाला. युद्धकाळातली निकोलसची जेनीबरोबरची वर्षे खडतर गेली. १९४२ मध्ये त्याला अॅन ही मुलगी झाली. नंतर बायको-मुलीसह तो पॅरिसमध्ये आला नि कशीबशी चित्रांवर आपली गुजराण करू लागला. निकोलसने या काळात व्यक्तिचित्रे आणि 'स्टील लाइफ' पद्धतीची चित्रे काढली. याच काळात त्याची आकृतिविरहित अमूर्त चित्रे सुरू झाली. निकोलस म्हणतो, 'मी जेव्हा तरुण होतो तेव्हा जेनीचे व्यक्तिचित्र रंगविले; खरे व्यक्तिचित्र ! पण मग मी स्वतःलाच विचारले की, मी काय रंगवले ? जिवंत मृत व्यक्ती की मृत जिवंत व्यक्ती ? नंतर मी कोणतीही एक वस्तू किंवा एक व्यक्ती रंगवू शकत नव्हतो. कारण कोणतीही वस्तू वा व्यक्ती एकच नसते, तर त्याच वेळी तिला अनेकविध गोष्टींचा संदर्भ असतो आणि त्यानंतर मी चित्रात अत्यंत मुक्त अभिव्यक्ती निर्माण करायचा प्रयत्न करू लागलो. एकाच विषयाच्या अनेकविध शक्यता नि भावना माझ्या मनात येऊ लागल्या.'

या काळातच निकोलसच्या चित्रात घनता येऊ लागली–विशेषतः लाल व हिरव्या रंगांच्या गडद वापरामुळे. नंतर चित्रकार ब्राकशी याची ओळख झाली. ते दोघे वारंवार कलाविषयक प्रश्नांची चर्चा करीत. ब्राक त्याच्यासंबंधी म्हणतो, 'स्तेल हा खरा रंगारी होता. आपल्या माध्यमातून तो सतत मुक्तता शोधीत होता. मूलतः चित्र हे

प्रेमासारखे आहे. ते साक्षात् असते. ती एक शक्ती आहे. स्तेलच्या अंगी ही शक्ती होती.' याच शक्तीचा प्रत्यय त्याच्या १९४५ ते ४७ मधल्या चित्रांत येतो. नाटयमय नि उद्दाम, पण तरीही शिस्तबद्ध अशीच चित्रे निकोलसने या काळात काढली. या काळात जणू साक्षात् वादळंच त्याने त्या चित्रात साठवली-गोठवली होती. नवे आकार नि धीट रंग यातून त्याने आपली ताकद दाखविली होती. रशियन चित्रपद्धतीचाही बराच परिणाम निकोलसच्या या चित्रांवर दिसतो. नंतरच्या त्याच्या रत्नासारख्या चमकणाऱ्या चित्रांतल्या रंगांचे मूळ त्याच्या या रशियन चित्रांच्या प्रभावात आहे. या काळातल्या त्याच्या चित्रांत त्याच्या रोजच्या जीवनातल्या चिंता नि दुःखामुळे (विशेषत: १९४६ त झालेला जेनीचा मृत्यू) आलेली खोली (depth) दिसते. जेनीसुद्धा चित्रकार होती.त्याच्या जन्मभरच्या साथीदाराकडून त्याला चित्रातही साथ मिळत होती. तिच्याशी कलाविषयक चर्चाही तो करी. त्यामुळे दोन सृजनशील कलावंतांच्या ताटातुटीचे त्याचे दुःख हे केवळ शब्दातीत होते यावेळी निकोलसला रंगांनी आधार दिला आणि त्याच्या दुःखाचे ठसे त्याच्या चित्रांवर उमटले. त्याची या काळातली चित्रे जड, गुंतागुंतीची नि दुःखाने फाटलेली आढळतात. युद्धानंतरच्या पॅरिसमधल्या मुक्तीचा आनंद नि शंकित वातावरणाचे सारे पडसाद या चित्रांमध्ये उमटले.

याच काळात पॅरिसला कलाप्रदर्शनांची लाट आली. आर्प, कँडिस्की, मॅग्नेली इ. नव्या चित्रकारांची प्रदर्शने सुरू झाली आणि जरी आकारविरहित कलेचा स्तेल हा एक प्रमुख समजला जातो, तरी त्याला मात्र असे वाटत नव्हते की, चित्रांची ती एकच पद्धत आहे. मात्र त्याला असे वाटत होते की, कुठे तरी भूतकाळाशी संबंध तोडला पाहिजे आणि नवी सुरवात केली पाहिजे.

निकोलसला सतत एखाद्या कलावंतांच्या कोंडाळ्यात रहाणे मात्र कधीच आवडले नाही. त्यापेक्षा स्वत:च्या आयुष्यात तो आनंदी होता. त्याने एक मोठा स्टुडिओ घेतला व फ्रान्कोयझ चॅपॅटन हिच्याशी लग्न करून तो राहू लागला. हळूहळू स्वत:चा मार्ग चोखाळतानाच त्याचे नाव प्रायोगिक कलेशी आपोआप जोडले गेले आणि त्याची प्रदर्शने पॅरिसमध्ये भरू लागली. इंग्लंडमध्येही चित्रे खपू लागली. १९५१ त त्याने रेने चारच्या कवितासंग्रहासाठी चित्रे काढली. त्याच वर्षी तो लंडनला गेला. तिथे निकोलसने काही मित्र जमवले. कलासमीक्षक क्लाइव्ह बेल हा त्याचा असाच मित्र. थेम्स नदीच्या बंदरावर फिरायला त्याला आवडे. तिथली जहाजे, बंदरे यांची निसर्गचित्रे त्याने रेखाटली. व्हिसलर, टर्नर, कॉन्स्टेबल या निसर्गचित्रकारांशीही निकोलसचा परिचय झाला. बोनार्ड या चित्रकाराची दोन रंग जोडण्याची पद्धत त्याला आवडली. त्याच्या चित्रांतली घनता नि काळेपणा जाऊन त्यात पांढरे, राखी रंग येऊ लागले. पहिले आततायी उष्ण रंग जाऊन त्या जागी फिके, मंद, उल्हसित रंग आले.

आता निकोलस जणू विमानातून किंवा पर्वतावरून लांबवर खाली तळाला दिसणारी निसर्गचित्रे त्या त्या परिणामानी काढू लागला. त्यातली काही तर केवळ काल्पनिक, 'मनातले प्रदेश' होते. एव्हाना त्याची स्वनिर्मित चित्रशैली तयार झाली होती. आता अवकाशाची पूर्ण खोली साऱ्या जाणिवेसहित त्याच्या चित्रात येऊ लागली. तो केवळ 'रंगवण्याच्या आनंदासाठी' रंगवू लागला. पिवळा उत्साहाचा रंग चित्रात डोकावू लागला. आनंदाने नि मुक्ततेने भारलेले रंग त्याच्या चित्रांत दिसू लागले. त्याचा स्वत:चा एकटेपणा चित्रांतून प्रतीत होऊ लागला. निकोलसची चित्रे आता कविता होऊ लागल्या. स्वीप्नल-गहिरे निळेपण, विरोधी रंगातून चित्रात येणारी एकात्मता यांचा रंगतोल चित्रांत येऊ लागला. तो रंगांचे वेगवेगळे प्रयोग करू लागला. रंगांच्या मोठमोठ्या लाद्याच्या लाद्या कॅनव्हासवर लावून त्यातून चित्राला येणारा पोत, जणू हात लावल्यावर होणाऱ्या स्पर्श-जाणीवेला सुखवू लागला. ही त्याची स्पर्शचित्रेच ! रंग जणू डोळ्यांपर्यंत डोळ्यांना स्पर्श करायला धावू लागले. केवळ 'शुद्ध' चित्रे तो काढू लागला. रंगांशी खेळू लागला. रंगांचे संगीत स्रवू लागले. 'संगीतकार' म्हणून गाजलेले निकोलसचे चित्र याच काळातले. 'फुटबॉल खेळाडू' हे पण खेळाडूंची गती रंगात पकडणारे असेच एक अविस्मरणीय चित्र

१९५१ ते ५२ हा निकोलसच्या जीवनातला कसोटीचा क्षण होता. त्याला काहीसे नैराश्य आले होते. तो या वेळी प्रकाशाच्या शोधात निघाला होता. तो म्हणतो, 'माझ्यात बदल होतोय ! देव जाणे, मला प्रकाशाची ओढ लागलीय.' याच काळात बर्फावरचा फूटबॉलचा खेळ पाहताना खेळाडूंच्या हालचालीतल्या गतिमानतेने तो मोहून गेला व 'फुटबॉल खेळाडू' हे चित्र काढून निळचा व लाल गडद रंगांत त्या खेळाडूंची गती व ओसंडणारा आनंद चित्रित केला. निकोलसला निसर्गाविषयी सतत आकर्षण वाटे. फुलांची गहिरी चित्रे त्याने काढली. जणू रंगांची भूक त्याला लागली होती आणि कुठचं चित्र काढू नि कुठचं नको, अशी बेभान अवस्था त्याला लाभली होती. शिल्प करण्याचेही काही प्रयत्न निकोलसने या काळात केले. तो आपली जाणीव वाढवीत होता. 'मी जे जे दिसते ते ते चित्रित करतो. मी पहायच्या अगोदर


**विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा............**

# मॅक्झिम गॉर्की

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

चित्र काढीत नाही. मी असं चित्र शोधतोय की, जे सर्व जगाला 'दिसेल!' असे तो म्हणायचा.

अविरत श्रम व कामामुळे निकोलस बेचैन झाला होता. तो पॅरिसलाही नंतर कंटाळला होता. मग तो सिसिली बेटात गेला. तिथे त्याने देवळे व निसर्गदृश्ये काढली. शहरापासून दूर जाऊन मेनरेवस येथे एका जुन्या घरात निकोलस राहिला व सतत चित्र काढण्यात व्यग्र राहिला. तो जेवणखाण विसरला. उत्तरेकडे नि दक्षिणेकडे या दोन्ही विरोधी वातावरणांकडे निकोलस सारखाच आकर्षित होत गेला. द० फ्रान्समध्ये करडचा, काळचा, निळचा रंगांची तीव्र चित्रे त्याने काढली. निसर्गातल्या साऱ्या शक्ती त्याच्या चित्रात उतरल्या. त्याच्या चित्रातले रंग कधी चमकणारे, कधी थंड तर कधी उष्ण तर कधी झाकोळलेपण नि उदास गहिरेपण. निकोलस विविध प्रयोग करीत राहिला. १९५५ मध्ये निकोलस आपल्या डायरीत लिहितो, 'प्रत्येक क्षणी माझा चित्राशी संबंध तुटतो, परत मी तो जोडतो, परत तुटतो; पण हे आवश्यक आहे. कारण मी तार्किकतेवर विश्वास ठेवतो. जेव्हा मला एखादी गोष्ट तार्किक वाटते तेव्हा मी वैतागतो आणि सहजच मग अतार्किकतेकडे वळतो.'

१९ मार्च १९५५ रोजी निकोलस द स्तेल या प्रतिभावंत चित्रकाराने आपल्याच स्टुडिओत सर्वांत वरच्या मजल्यावरून उडी टाकून आत्महत्या केली; पण ती केवळ त्याची सृजनशक्ती पांगळी होत चालल्यामुळे असे वाटत नाही. कारण त्या वेळीच त्याची अनेक चित्रे अपुरी होती आणि संगीतावरचे एक भव्य चित्र तो रंगवीत होता. कदाचित अविरत श्रम नि प्रकृतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्याच्या मनात हा आत्मघातकी विचार शिरला असावा किंवा कदाचित असेही असावे की, काही वेळा एखाद्या प्रतिभावंताला एका ठराविक उंचीवर गेल्यावर त्याच्यापुढचे क्षितिजच नाहीसे होत असावे की, ज्यामुळे मृत्यूची सोयरिक अटळ वाटावी. त्याच्या डायरीतील पुढील वाक्ये वाचल्यावर त्याच्या आपल्या कलामाध्यमाच्या पकडीवर नि जीवनाच्या संवेदनाशीलतेवर काही प्रकाश पडेल—

'तुम्ही जे पहाता किंवा तुम्हाला पाहिले असे वाटते ते कधीच रंगवीत नाही. तुम्ही रंगवता ते हजार उडणाऱ्या नाडचांनी!'

'समोरचा खुला उघडा समुद्र सर्वांचा आहे; पण प्रत्येकाला दोन निराळ्याच नाकपुड्या असतात की, ज्याला त्याचा वास येतो!'

'हे (चित्रं काढणं) बुद्धिमत्तेवर अवलंबून नाही. हे एखादी गोष्ट करण्याच्या इच्छेवर अवलंबून नाही नि हे एखादी गोष्ट न करण्याच्या इच्छेवरही अवलंबून नाही!'

'एखादा सर्वच हरवून बसतो एखाद्या क्षणी. एखादी गोष्ट घडल्यावर. सर्व इथेच आहे. आपल्या सर्वांच्या बाहेर!'

'चित्रं काढणं म्हणजे एखाद्याने आपली कातडी वाढविण्यासारखे आहे!'

'एखादी गोष्ट अत्यंत कठीण आहे तर माणसाने त्याच्याशी अत्यंत जवळीक केली पाहिजे!'

'केव्हा केव्हा हे जरुरीचं असतं की, आपल्या इच्छा आपल्याला सर्वोच्च एकात्मतेकडे नेऊन पोचवतात!'

—प्रदीप नेरूरकर

---

हक्कभंग-प्रकरण — पृष्ठ ८ वरून

आल्यावर जुना ठराव त्यांना लागू होत नाही, असा युक्तिवाद त्यांच्या बाजूने केला जाण्याची शक्यता आहे. हा वाद कोर्टात जाण्याचाही संभव आहे.

इंदिरा गांधींचे सभासदत्व रद्द करणे म्हणजेच चिकमगळूरचा निकाल नाकारणे होय, असा युक्तिवाद हक्कभंग ठरावावरील चर्चेत करण्यात आला. याबाबतीत एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. मतदारांनी आपला प्रतिनिधी निवडला याचा अर्थ त्याला वाटेल तसा वागण्याचा परवाना मिळाला असा नव्हे. लोकसभेच्या हक्कांचे रक्षण करण्याची जबाबदारी सभासद या नात्याने त्याच्यावर असतेच. हक्कभंग होईल असे वर्तन त्याने करता कामा नये आणि केले तर त्याबद्दल होणारी शिक्षा भोगलीच पाहिजे! इंदिरा गांधींच्या बाबतीत उपस्थित करण्यात आलेला आणखी एक मुद्दा म्हणजे चिकमगळूरहून निवडून आल्यानंतर काही त्यांनी हक्कभंग केलेला नाही. पूर्वीच्या हक्कभंगाबद्दल त्यांचे चिकमगळूरचे सभासदत्व रद्द करणे कितपत योग्य होईल? याला उत्तर असे की, पूर्वीच्या हक्कभंगाबद्दल पूर्वीच शिक्षा व्हावयास होती हे म्हणणे तत्त्वतः बरोबर आहे; पण आणीबाणीच्या काळात ते शक्यच नव्हते आणि पूर्वी घडलेला गुन्हा नंतर उघडकीस आला म्हणून त्याची शिक्षा रद्द कशी होईल?

या शिक्षेसंबंधात मनात येणारा आणखी एक विचार म्हणजे इंदिरा गांधी चिकमगळूरहून निवडून आल्या म्हणून त्यांचे सभासदत्व रद्द करण्याची शिक्षा लोकसभा देऊ शकली; पण त्या लोकसभा निवडणुकीला उभ्याच राहिल्या नसत्या किंवा निवडून आल्या नसत्या तर ही शिक्षा त्यांना देणे शक्य नव्हते. ज्या सभासदच नाहीत त्यांचे सभासदत्व कसे रद्द करणार? त्या परिस्थितीत कारावासाचीच शिक्षा त्यांना द्यावी लागली असती.

लोकप्रतिनिधी म्हणून असलेले कर्तव्य आणि राजकीय किंवा अन्य कारणाने झालेल्या शिक्षेने हे कर्तव्य बजावण्यात आलेला अडथळा, असा संघर्ष निर्माण झाल्यास कशास महत्त्व द्यावयाचे असा प्रश्न पूर्वी केरळमध्ये १९६५ मध्ये उपस्थित झाला होता. निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट सर्वांत मोठा पक्ष म्हणून निवडून आले होते. त्यांचे अनेक सभासद त्या वेळी तुरुंगात होते व तुरुंगातूनच त्यांनी निवडणूक लढविली होती; पण निवडून आल्यानंतरही त्यांची मुक्तता झाली नाही. लोकप्रतिनिधीचे कर्तव्य त्यांना बजावता आले नाही. केंद्र सरकारने त्यांच्याबाबत घेतलेला निर्णय योग्य नव्हता.

इंदिरा गांधी पुन्हा निवडून आल्यास अशाच स्वरूपाचा प्रश्न उपस्थित होणार आहे; पण याबाबतीत एक फरक म्हणजे इंदिरा गांधींना हक्कभंगाबद्दल झालेली शिक्षा ही राजकीय स्वरूपाची शिक्षा मानता येणार नाही; तरीही त्या पुन्हा निवडून आल्यास शिक्षा आणखी न ताणता लोकप्रतिनिधी म्हणून त्यांना आपले कर्तव्य बजावू देणेच योग्य होईल.

# मोरारजींची यशस्वी चाल

पृष्ठ ७ वरून....

तरी भलताच प्रामाणिक आहे. आपल्याबद्दल जनतेने खोट्या भ्रमात राहू नये असा त्यांचा सतत प्रयत्न चालू असतो. गेल्या ऑक्टोबर-मध्ये इंदिरा गांधींच्या अटकेचा खेळखंडोबा करून त्यांनी आपण 'पोलादी पुरुष' असल्याचा भ्रम त्वरित नष्ट केला. गेल्या आठवड्यात लोकसभेत मोरारजींविरुद्ध फुसके निवेदन करून, वेळोवेळी राजीनाम्यांची धमकी देऊन व हरिजनांवरील अत्याचाराबाबत लोकसभेत सहानुभूतिशून्य निवेदन करून त्यांनी आपण मुरब्बी राजकारणपटू असल्याचा भ्रमही नष्ट केला. आता चरणसिंगांना उत्तरप्रदेश व बिहार या राज्यात प्रचंड पाठिंबा आहे, लोकसभेत जवळजवळ शंभर खासदारांचा गट त्यांच्या खिशात आहे, हा लोकांचा आपल्याबद्दलचा भ्रम नष्ट करण्याचा त्यांचा उद्योग सुरू आहे. चरणसिंगांनी दुर्दैवाने जर नवीन पक्ष स्थापन केला तर लोकांचा हा देखील भ्रम नष्ट होईल व शे. का. पक्षासारखी या नवीन पक्षाची केविलवाणी अवस्था झाल्याखेरीज रहाणार नाही !

चरणसिंगांबाबत सामान्य जनतेत बरेच भ्रम असले तरी मोरारजींनी मात्र चरणसिंगांची ताकद पूर्ण अजमावली आहे, म्हणूनच त्यांना सन्मानाने मंत्रिमंडळात परत घेण्यास ते उत्सुक नाहीत. चरणसिंग गृहमंत्री असताना इंदिरा गांधींना झालेली अटक, त्यांची त्वरित झालेली सुटका, देशभर उसळलेल्या दंगली, इंदिरा गांधींच्या सुटकेनंतर त्यांचे झालेले प्रचंड स्वागत या पार्श्वभूमीवर या वेळची अटक, १८००० लोकांच्या दंगलीपूर्व अटकेमुळे तुरळक दंगली वगळता देशभर सुरळीत असलेले नागरी जीवन, हे मोरारजींचे यश लक्षणीय ठरते. या यशामुळे मोरारजींचे पक्षातील स्थान अधिकच बळकट झाले आहे आता जर चरणसिंगांना मंत्रिमंडळात पुन्हा प्रवेश करायचा असेल तर तो केवळ मोरारजींच्या अटींवरच करावा लागेल ! मोरारजींच्या अटी चरणसिंगांना सहज पचणाऱ्या नसतील हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही !

### आक्रमक प्रत्युत्तर

आता लोकसभेने इंदिरा गांधींना फर्मावलेली ही 'कडक' शिक्षा इंदिराजींना संपवू शकेल का ? तशी शक्यता फारशी दिसत नाही. इतक्या सहजतेने हार खाणाऱ्यांपैकी इंदिरा गांधी नाहीत ! अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्दीने आगे कूच करण्याचा त्यांचा स्थायीभाव आहे. म्हणूनच मार्च १९७७ मधील संपूर्ण पाडावानंतर त्या चिकमगळूरमधून निवडून येऊन आक्रमक पवित्र्यात उभ्या ठाकल्या होत्या.

त्यांच्या या आक्रमक पवित्र्याला मोरारजींनी देखील तेवढ्याच आक्रमकतेने उत्तर दिले आहे. जवढ्या सहजतेने इंदिरा गांधींनी आणीबाणीत हजारो लोकांना 'मिसा'त डांबले, जेवढ्या तडकाफडकी 'सुब्रह्मण्यम स्वामींचे' राज्यसभेचे सदस्यत्व रद्द केले त्याच सहजतेने व चपळाईने आज जनता पक्षाने इंदिरा गांधींना प्रत्युत्तर दिले आहे ! आज तरी सामान्य जनतेच्या मनात हुकूमशाही = आणीबाणी = इंदिरा गांधी हेच समीकरण दृढ झाले आहे. लोकशाहीच्या पुनः प्रस्थापनेसाठी जनता पक्षाला लोकांनी सत्तेवर आणले आहे. त्यामुळे इंदिरा गांधींचा संपूर्ण पाडाव हेच जनता पक्षाचे एक प्रमुख ध्येय राहिले पाहिजे !

या अटकेमुळे इंदिरा गांधी फार 'लोकप्रिय' होतील का ? तशीही शक्यता फारशी नाही. केवळ तुरुंगवासामुळे लोकप्रियता प्राप्त होते हा सिद्धान्त सदासर्वकाळ खरा असता तर आज संजय गांधी, जांबुतराव धोटे, कर्तारसिंग थत्ते लोकप्रियतेच्या शिखरावर असावयास हवे होते. इंदिरा गांधींना काही दिवस कारावासात डांबल्यामुळे त्या लोकप्रिय होतील या भीतीने गारठणारी मंडळी हे विसरतात की, जनता पक्षाच्या नेत्यांना लोकप्रियता लाभण्यासाठी पुरे १॥ वर्षपर्यंत 'मिसा'त खितपत पडावे लागले व त्यालाही आणीबाणीतील अत्याचारांची जोड मिळावी लागली.

आता लोकसभेतून हकालपट्टी झाल्यामुळे इंदिरा गांधींना निदान पुढील ७–८ महिने तरी भारतीय संसदीय राजकारणात प्रवेश नाही! चिकमगळूर येथील पोटनिवडणूक काय किंवा आंध्रमधील एखादी पोटनिवडणूक काय प्रत्यक्ष ती होईपर्यंत अजून बराच वेळ लागेल. इंदिरा गांधींवरील निरनिराळे खटले आज अनेक कोर्टांत चालू आहेत. पुढील सहा महिन्यांमध्ये त्यांची बरीच प्रगती होईल. या खटल्यांना वेग आणण्यासाठी सरकार विशेष न्यायालय स्थापन करू शकेल. चिकमगळूर येथील प्रचंड विजयानंतर इंदिरा गांधींना बसलेला हा धक्का तेवढाच प्रचंड आहे ! या धक्क्यामधून त्या पुरेपूर सावरण्याच्या आतच जर जनता पक्ष त्यांच्यामागे खटल्यांचे शुक्लकाष्ठ लावू शकला तर मात्र इंदिरा गांधींना पुढील काळ खडतर ठरणार आहे !

आणीबाणीतील अत्याचार, भ्रष्टाचार यांच्याशी संबंधित असलेल्या आरोपांबद्दल इंदिरा गांधींना कोणती व किती शिक्षा द्यावयाची हे न्यायालयाचे काम आहे.

मात्र मोरारजीभाईंच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाने घेतलेल्या या तडफदार निर्णयामुळे यापुढे भारतीय राजकारणात इंदिरा गांधींना फुकाफुकी 'पुढे चाल' मिळणार नाही एवढा विश्वास लोकशाहीप्रेमी जनतेच्या मनात नक्कीच निर्माण झाला आहे ! □


## हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ? राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर । आवृत्ती : तिसरी (सचित्र) । किंमत : रुपये पंचेचाळीस । राजहंस प्रकाशन, पुणे

चित्रपट । सदानंद बोरसे

'घटश्राद्ध' या सुप्रसिद्ध कन्नड चित्रपटावरील अशोक प्रभाकर डांगे यांचे परीक्षण 'माणूस'मधून यापूर्वीच येऊन गेलेले आहे (१२ ऑगस्ट अंक). या चित्रपटाकडे पाहण्याचा आणखी हा एक वेगळा दृष्टिकोन..

# निर्दय बंधने आणि जिताजागता माणूस यांच्यातील द्वंद्व

गेल्या काही वर्षांमध्ये कन्नड चित्रपटसृष्टीने भारतीय चित्रसृष्टीच्या इतिहासात अतिशय मोलाची भर घातली आहे. 'काडू', 'संस्कार', 'वंशवृक्ष', 'चोमना दुडी' इत्यादींच्या प्रभावळीतील 'घटश्राद्ध' हे आणखी एक चित्र! या चित्राचे दिग्दर्शक श्री. कासारवल्ली यांचा हा पहिलावहिला चित्रपट सुवर्णकमलविजेत्या 'घटश्राद्ध'ला या वर्षीच्या (१९७८) सर्वोत्कृष्ट संगीताचे (संगीतकार–डी. व्ही. करंथ, गेल्या वर्षीच्या सुवर्णकमलविजेत्या 'चोमना दुडी'चे संगीतकार व दिग्दर्शक) आणि सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचेही पारितोषिक मिळाले आहे.

'घटश्राद्ध' हे नाव ऐकताच एक विचित्र भावना अथवा जाणीव माझ्या मनात निर्माण झाली. चित्रपटाचा कथाविषय माहीत नसतानाही श्राद्ध आणि घट म्हणजे मडके या दोन्ही गोष्टी अंत्यसंस्काराशी संबंधित असल्याने एक उदासी त्या नावातच झाकाळून टाकते. आणखी एक गोष्ट म्हणजे ही उदासी मरणाची अथवा मृत्यूबद्दलच्या भीतीची वा विचाराची नसते, तर मरणापेक्षाही नंतरच्या कर्मकांडाची, अंत्यसंस्कारविधीची चीड अथवा वैफल्य यांचीच बोच त्या उदासीत असते. अर्थात त्यामुळे या विषयावर हा चित्रपट आहे, अशा पूर्वग्रहाने मी चित्रपटास गेलो नाही; पण 'घटश्राद्ध' हे कदाचित प्रतीक, एखादे चिन्ह म्हणून वापरले असेल, असे मात्र मनात येत होते. आणखी एक म्हणजे घटश्राद्ध, वंशवृक्ष, कनकांबरी, चारुलता ही नावे कदाचित त्यांच्या संस्कृत घाटामुळे असेल, सामासिकतेमुळे असेल, गोडव्यामुळे वा चमत्कृतीमुळे असेल अथवा त्या नावापाठीमागे असलेल्या चित्रपटांच्या प्रभावामुळे असेल (कदाचित कोणतेच कारणही नसेल); पण ही नावे मला नेहमीच मोहवत आली आहेत.

'घटश्राद्ध'ची घटना आहे यमुना नावाच्या विधवा तरुणीची. ही एका छोटयाशा गावातील मठाधिपतीची (मठ म्हणण्यापेक्षाही मंदिरातील वेदपाठशाला म्हटल्यास अधिक योग्य.) मुलगी. तिला गावातील एका शाळामास्तराशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून वाळीत टाकले जाते. त्यासंबंधी खात्री पटल्यानंतर तर तिचा बापच आपल्या मुलीचे जिवंतपणी श्राद्ध करतो. अशी ही घटना यमुनाच्या जीवनातील असली, तरी ही कथा आहे नानी नावाच्या छोटया पोराची. त्याच्याच जीवनात ही घटना घडते, त्याच्याच हातांनी तिला आकार मिळतो, शेवटी ती त्याच्याही हाताबाहेर जाते आणि कथेची मांडणीही नानीला केंद्रबिंदू नाही तरी सर्वात प्रमुख घटक म्हणून ठेवूनच केली आहे. माणसाचे वय जितके लहान, तितका तो आयुष्यातील चांगल्या-वाईट संस्कारांपासून अधिक मुक्त आणि म्हणूनच कदाचित माणूसपणाच्या अधिक जवळचा असतो. या कथेमध्ये नानीला प्रमुख घटक ठरविताना त्याचे वय आठ-नऊ वर्षांचे ठेवलेले आहे. तो इतका मोठा आहे की, त्याला आजूबाजूच्या परिस्थितीची, घडणाऱ्या घटनांची जाण आहे; पण इतका मोठा नाही की, ती परिस्थिती वा घटना बदलण्याचे त्याच्यात त्राण आहे. तो इतका लहान आहे की, रूढींच्या संस्कारांनी त्याचे मन रखरखीत व कडक बनलेले नाही, त्यामुळे घटनांची योग्यायोग्यता तो पूर्वदूषित ग्रहाने वा संस्कारित अनुभवांवरून ठरवत नाही आणि तो इतका लहानही नाही की, तान्ह्या अर्भकाप्रमाणे त्याला इतर गोष्टींची जाणीवच नसावी. अशा पोराचे दृष्टिकोन, नीती, धर्म, शील इत्यादींबद्दलचे विचार परिपक्व नसतीलही कदाचित; पण म्हणूनच ते अधिक शुद्ध, आदिमाच्या अधिक जवळ जाणारे आणि जगरहाटीनुरूप म्हणून नव्हे तर स्वतःला पटते आहे म्हणून जन्मणारे असतात. नानीच्या प्रत्येक घटनेवरील क्रिया-प्रतिक्रिया पाहताना याचाच अनुभव येतो.

यमुना ही तरुण विधवा. असंख्य सामाजिक जाचांतून एखाद्या मास्तरकडून मिळालेला प्रेमाचा घोट तिने स्वीकारला यात जसे तिचे काही चुकले नाही, त्याचप्रमाणे शेवटी स्वतःचा गळा मोकळा करण्यासाठी त्या मास्तराने तिचा गर्भपात करविला, यात त्याचेही काही चुकले नाही. यमुनाची शारीरिक वासना आणि प्रेम जेवढे खरे होते, तेवढाच सामाजिक चौकटीला मानणारा मास्तरमधील भित्रा व्यवहारीपणाही खरा होता. हीच गोष्ट या चौकटीला मानणाऱ्या आणि म्हणून यमुनावर बहिष्कार टाकणाऱ्या गावकऱ्यांची आणि तिच्या नावाने श्राद्ध करणाऱ्या तिच्या बापाची. यात दोष वा चूक कोणाकडेच नाही. असलीच तर प्रत्येकाच्या मेंदूत तयार झालेल्या संस्कारांची आहे. (संस्कार हा शब्द सुसंस्कार वा कुसंस्कारमधील संस्कारासारखा नसून conditioned reflex या अर्थी मी वापरला आहे.) हे संस्कार बाजूला ठेवून प्रत्येक गोष्टीचा स्वच्छ, विशुद्ध, द्वंद्वहीन, पूर्वग्रहविरहित विचार करणे बहुतेकांना कठीण जाते आणि मग आयुष्याला आधार व आकार देण्यासाठी निर्माण केलेले सापेक्ष

नियम, जीवनपद्धती यांची चौकट बनून ती आयुष्याला बांधून ठेवते, कोंडून घालते, खुरटून टाकते. यमुनाला गावकऱ्यांकडून मिळणारी वागणूक ही ती मजबूत चौकट आहे, तर नानी हा पूर्वग्रहविरहित भूत-काळाच्या पायाचा आधार न घेता प्रतिक्षणी नव्या वर्तमानाच्या डोळ्यांनी पाहणाऱ्यांचा प्रतिनिधी आहे. नानीच्या वयामुळे ही कथा केवळ तात्कालिक समस्याप्रधान कथा न उरता आयुष्याला बांधणाऱ्या, चिणणाऱ्या, चिरणाऱ्या चौकटीबरोबरच्या सार्वकालिक झगड्याची कथा बनते. मात्र या झगड्यातही त्या माणसाचे माणूसपण देव बनत नाही, हा झगडा जिंकून अटळ नियतीवर वा स्वतःच्या अगतिकतेवर मात करण्याइतके समर्थ बनत नाही वा सतत-सततच्या चांगुलपणाच्या, दया-अहिंसा-शांतीचा वर्षाव करीत राहात नाही. त्यालाही भीतीचे कंगोरे आहेत, दोषांचे उंचवटे आहेत आणि म्हणूनच ते खऱ्याशी पक्के इमान राखून आहे. शेवटी यमुनाला गावाबाहेर रडताना पाहत-पाहत स्वतःही रडत लांब जाणारा अगतिक नानी, सगळेच सहाध्यायी पाठशाला सोडून जात असताना स्वतःही यमुनाला सोडून जाण्याची तीव्र इच्छा करणारा नानी—ही अशा खाचखळग्यांची उदाहरणे आहेत. माणसातील कमतरतेची प्रकर्षाने जाणीव करून देणाऱ्या या गोष्टींमुळे चित्रपट स्मृतीच्या चाळणीत अडकून राहतो. अगदी 'तरुण विधवांचा प्रश्न' इतक्या वरवर जरी पाहिले, तरी 'शारीरिक (तथाकथित) पावित्र्य म्हणजे शील वा नीती का?' इतक्या मुळापर्यंत ही कथा पोहोचते. याशिवाय नानी हा कथेतील एक पात्र म्हणून अंतर्भूत झालेला असल्याने तो केवळ एक निष्क्रिय निरीक्षक वा कोरडा उपदेशक राहात नाही, तर त्याच्या भाव-भावनांसकट एक प्रभावी व्यक्तिरेखा म्हणूनच आकार घेतो.

अनंतमूर्तींनी कथेत घेतलेला हा विषय जर समस्या वा समाजसुधारणा एवढाच मर्यादित राहिला असता तर ती कथा (व ओघाने चित्रपटही) प्रचारकी, तात्कालिक आणि कदाचित उथळही झाला असता; कारण कर्नाटकात जरी विधवांचा प्रश्न अगदी अशा ज्वलंत स्वरूपात आजही उभा असल्याचे माझ्या एका मित्राने सांगितले, तरी अगदी महाराष्ट्रातही तो पुराणा आणि काहीसा कालबाह्य वाटण्याची शक्यता आहे. अनंतमूर्तींना आपल्याकडील रूढींचा आधार घेऊन असा जीवनाला खच्ची करणाऱ्या चौकटीबरोबरचा लढा कथेतून मांडण्याची आवड असावी. 'चोमना दुडी'ची कथाही माझ्या माहितीप्रमाणे त्यांचीच आहे आणि तिच्यातही हाच झगडा झाला आहे.

आपल्या पहिल्याच चित्रपटासाठी अशा कथेची निवड करून दिग्दर्शक गिरीश कासारवल्लींनी एक अधिक गुण आपल्या खाती जमा केला. ही कथा घडते कर्नाटकाच्या एका खेड्यात वा अत्यंत छोट्या गावात. घरांच्या अंधाऱ्या खोल्या, प्रशस्त मंदिरे, घरांबाहेरच्या ओटयांवर कट्टे टाकून चकाट्या पिटणारे लोक, नदीचा पायऱ्या-खडकांनी बनलेला घाट, पायांच्या रहदारीनेच हालचाल करणारे आणि मध्यावर फरसबंदी अंगावर घातलेले रस्ते, गावाला लगटून असलेले दाट रान, वस्तीबाहेरचे बाटगे ख्रिस्ती घर, शाळा या सगळ्यांनी बनलेले ते गाव अगदी साजेसेच आहे.

संपूर्ण चित्रपटातून सर्व पात्रे कथेला पोषक अशी आपली स्वभाववैशिष्ट्ये ठळकपणे मांडत उभी राहतात. उदाहरणार्थ शास्त्री हा त्या पाठशालेत शिकणारा एक विद्यार्थी. तो खोडकर नाही; तर एखाद्या पशूसारखा क्रूर आणि हिंसक आहे. ते त्याच्या प्रत्येक हालचालीतून नुसते दिसत नाही, तर अधिकाधिक गडद होत जाते. सुरुवातीला गणेशा या दुसऱ्या विद्यार्थ्याला आरतीचा चटका देणे, यमुनाला कढत पाण्याची कळशी देऊन तिचा हात भाजविणे, नानीच्या अंगावरून वासनांनी भरलेली नजर व हात फिरविणे, नानीला रानातील सापाच्या मूर्ती दाखवून घाबरविणे, शेवटी पाठशालेतून बाहेर पडताना बिडी पेटविणे, यमुनावर टेहळणी करणे इत्यादी घटनांमधून तो डोळ्यांपुढे हुबेहुब जिवंत होतो. तीच गोष्ट दगडी चेहऱ्याने प्रवचन-अध्यापनापासून यमुनेच्या श्राद्धापर्यंत सर्व करणाऱ्या यमुनेच्या बापाची; यमुनेच्या शीलभ्रष्टतेचा डांगोरा पिटणाऱ्या गोदाक्काची; एखाद्याच प्रसंगात येऊन जाणाऱ्या कुटाळ गावकऱ्यांची. नानी आणि यमुना या प्रमुख व्यक्तिरेखांबद्दल तर बोलणेच नको.

सुरुवातीपासून प्रत्येक गोष्टीवर फिरणारा कॅमेरा काही ना काही तरी बोलत असतो, दाखवत असतो, सुचवत असतो कधी कधी 'हे कशाला दाखविले?' असा काहीसा प्रश्न माझ्यापुढे पडला; पण त्याचे उत्तर व कारण लगेचच मिळायचे. अगदी ठळक उदाहरण द्यायचे तर— शेवटी हमसाहमशी रडणाऱ्या पाठमोऱ्या यमुनाच्या केसांवरून कॅमेरा फिरतो, केस ठळकपणे ध्यानात येतील अशा रीतीने फिरतो. नंतर जेव्हा केशवपन केलेली यमुना दिसते तेव्हा त्या केसांचा संबंध ध्यानात येतो. संस्कृत पाठ-

हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.
( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )
—डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये
राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

शालेतील विद्यार्थ्यांचे जुगार, बिड्या असले उपद्व्याप आणि दुसरीकडे शाळेत 'उत्सव' असा बरोबर उच्चार करण्यासाठी धडपडणारी मुले यातूनही निरर्थक कर्मकांडाची छान टर उडविली आहे. पात्रांच्या रंगभूषा, वेशभूषा इत्यादी शारीरिक जडणघडणीपासून त्यांच्या मानसिक जडणघडणीपर्यंत प्रत्येक गोष्टीवर दिग्दर्शकाचा सुबक हात फिरला आहे. तंत्राच्या बाबतीतील साधेपणा चित्रपटातील वास्तव भरून काढते.

सर्वांत प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे चित्रपटात जी जी गोष्ट येते, घडते, ती चित्रपटाचा नूर स्पष्ट करण्यासाठी, निर्दय बंधने आणि जिताजागता माणूस यांच्या द्वंद्वाचा जो चित्रपटमय (Cinematic) अनुभव तो जास्तीत जास्त ताकदीने प्रेक्षकापर्यंत पोहोचविण्यासाठी. त्यामुळे कोणत्याही एकाच घटकाचे प्रभुत्व न होता सगळेच एकमेकांना आणि पर्यायाने त्या अनुभवाला पूरक ठरतात.

अभिनेत्यांच्या बाबतीत–

प्रत्येकजण आपापली भूमिका अक्षरशः जगला आहे, असे वाटावे. एवढेच पुरेसे आहे. नानी आणि यमुना या भूमिका साकारणाऱ्या कलाकारांच्या (त्यांची नावे अनुक्रमे अजितकुमार, अजयकुमार आणि मीना अशी असावीत.) टपोऱ्या अणि विलक्षण बोलक्या, भावपारदर्शक डोळ्यांचा खास उल्लेख करावाच लागल. हीच गोष्ट शास्त्रीचे काम करणाऱ्या कलाकाराच्या खुनशी नजरेची. तिघांचेही दृष्टिक्षेप लाखो संवादांचे काम करून जातात.

चित्रपटाला संगीत दिले आहे डी. व्ही. करंथ यांनी.

अत्यंत साधे, वास्तव त्यामुळे ओबडधोबड व तांत्रिक सफाई नसलेले हे संगीत चित्रपटाला विलक्षण पोषक ठरते. काही हाताच्या बोटांवर मोजण्याइतके कोवळे प्रसंग फक्त बासरी वा सतारीचे श्रीमंती साज लेवून येतात. बाकी सर्व प्रसंगांमध्ये शंख, घंटा, थाळ इत्यादी मुख्यतः धार्मिक प्रसंगी वाजविण्याच्या वाद्यांचा वापर केला आहे वा केवळ मंत्रोच्चारण ऐकविले आहे. धीरगंभीर स्वरात ऐकू येणारे ते समूहाचे मंत्रोच्चारण प्रत्येक वेळी चित्रपटात एक गंभीर दरारा निर्माण करते. शेवटच्या प्रसंगात यमुनाच्या केविलवाण्या करुण विव्हळण्याच्या आणि श्राद्धविधीच्या वेळीच्या वाद्यवादनाच्या मंद आवाजाच्या मिश्रणात कोऱ्या चेहऱ्याने एकेक विधी करणारा यमुनाचा बाप अक्षरशः काळीज चिरत जातो. यमुनाचे रडणे व आक्रोश तर अक्षरशः असह्य होतो आणि एवढा जबरदस्त संगीतकार आणि प्रभावी संगीत असूनही कुठेही हे संगीत चित्रपट खाऊन टाकत नाही, ते चित्रपटाच्या पोषणरसाचा एक घटक म्हणूनच आपली भूमिका बजावते.

शेवटी 'चोमना दुडी' आणि 'जैत रे जैत'शी थोडीशी 'घटश्राद्ध'ची तुलना करण्याचा मोह मला आवरता येत नाही.

'चोमना दुडी'ला लाभलेल्या सन्मानांपासून तो घडविण्यात हातभार लावणाऱ्या कलाकारांपर्यंत खूप गोष्टी त्याच्या व 'घटश्राद्ध'च्या समाईक आहेत. चित्रपट म्हणून 'चोमना दुडी' हा अधिक प्रभावी होता, असे माझे मत आहे; कारण त्यात आलेले अस्पृश्यता, भूमिहीनता इत्यादी प्रश्न हे एका कुटुंबातील पाच व्यक्तींशी निगडित होते आणि म्हणूनच अधिक गुंतागुंतीचे, नाजूक बनले होते. साहजिकच कथा म्हणून तो चित्रपट घटश्राद्धपेक्षाही खूब उतरे. शिवाय 'दुडी' हे वाद्यच प्रतीकरूपाने घेतल्याने करंथांनी आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावून त्या वाद्याच्या वाजविण्यातून चोमाचे निरनिराळे भावप्रवाह आकारले आहेत. शिवाय त्या चित्रपटात कलाकारांपेक्षा कॅमेरा अधिक बोलत होता, कलाकारांच्या चेहऱ्यावरील रेषा अधिक बोलत होत्या. 'घटश्राद्ध'-मध्ये मुबलक संवाद असल्याने माझ्यासारख्या कानडी न येणाऱ्या प्रेक्षकापर्यंत अधिकाधिक बारकाव्यांनिशी 'चोमना दुडी' जास्त पोहोचतो. (अर्थात ही माझी कमतरता आहे. याचे भान ठेवूनही 'चोमना दुडी'चे यशही आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.) 'चोमना दुडी'त वास्तव आणि प्रतीकात्मक सूचकता यांचा अतिशय मनोज्ञ मिलाफ दिसून येतो. 'घटश्राद्ध'ची मांडणी त्या मानाने वास्तवाचा पदर पांघरणारी व त्यामुळे काहीशी सरळसोट आहे. चित्रपटांच्या कथानकाच्या स्थळ-काळाचा विचार केल्यासही 'चोमना दुडी'चा आवाका अधिक मोठा आणि म्हणूनच जीवनदर्शन अधिक समृद्ध आहे.

अर्थात 'चोमना दुडी'चा सरसपणा हे 'घटश्राद्ध'चे वैगुण्य नाही, हे मी पुन्हा एकदा स्पष्ट करतो.

'जैत रे जैत' आणि 'घटश्राद्ध' ही तुलना म्हणजे पुन्हा आशयानुरूप आविष्कार की आविष्काराच्या आधाराने आशय असा विचार करणे आहे. 'घटश्राद्ध'मध्ये कोणत्याही प्रकारची नवी आविष्कारपद्धती मांडलेली वा वापरलेली नाही; पण आविष्कारासाठी अट्टाहास न करता समृद्ध आशयाची निवड करून ती समृद्धता तितक्याच सामर्थ्याने प्रेक्षकांपर्यंत पोहचविणे आणि त्यानुरूप आविष्कारपद्धती स्वीकारणे असाच प्रकार केला आहे आणि पुन्हा एकदा आशयाचे श्रेष्ठत्वच सिद्ध झाले आहे.

□